

अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी अजित पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २९ जून २०२४

# घोषणांचा पाऊस! मतांची बेगमी!!

## वित्तमंत्री अजित पवार यांनी सादर केला अंतरिम अर्थसंकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाराष्ट्राचे वित्तमंत्री म्हणून अजित पवार यांनी आपल्या कारकीर्दीतील दहावा अर्थसंकल्प सादर करताना सर्व समाजघटकांसाठी विविध योजना व घोषणांचा वर्षाव करून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मतांची भक्कम बेगमी केली आहे. महाराष्ट्राची गौरवशाली आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरा असलेल्या वारकरी बांधवांसाठी 'मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ', पंढरपूर वारीचे जागतिक नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्याची घोषणा, वारीतल्या मुख्य पालख्यांतील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपये, 'निर्मल वारी'साठी ३६ कोटींचा निधी, २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना', महिलांना रिक्षा व्यवसायासाठी आर्थिक मदत देणारी 'पिंक ई-रिक्षा' योजना, राज्यातील ५२ लाख कुटुंबांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी 'मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना', महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना', त्यांच्यासाठी १५ लाख कर्जापर्यंतच्या व्याजाचा परतावा, ओबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना चालू वर्षापासून अभियांत्रिकी, वस्तुशास्त्र, फार्मसी, मेडीकल, शेतीविषयक सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक आणि परीक्षा शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती, राज्यातील दहा लाख युवकांना प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण आणि दरमहा दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन देणाऱ्या 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने'ची घोषणा, 'मुख्यमंत्री बळीराजा सवलत योजनें'तर्गत राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा, दुधउत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रुपये अनुदान, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, नवी मुंबईत महापे येथे जेम्स ॲन्ड ज्वेलरी पार्कची निर्मिती, सिंधुदुर्ग येथे ६६ कोटींच्या आंतरराष्ट्रीय पाणबुडी केंद्राची तसेच स्कुबा डायव्हिंग केंद्राची निर्मिती, बारी समाजासाठी 'संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळा'ची स्थापना, स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर दरवर्षी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन, महाराष्ट्राचा अभिमान, स्वाभिमान उंचावणाऱ्या अशा अनेक निर्णयांचा समावेश असलेल्या, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक अशा सर्व घटकांना न्याय, शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, आरोग्य, पर्यटन अशा विविध क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा वर्ष २०२४ - २५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला.**



***उदंड पाहिले, उदंड ऐकिले***
***उदंड वर्णिले, क्षेत्रमहिमे |***
***ऐसी चंद्रभागा, ऐसे भीमातीर***
***ऐसा विटेवर, देव कोठे ||***
***ऐसे संतजन, ऐसे हरिचे दास***
***ऐसा नामघोष, सांगा कोठे |***
***तुका म्हणें, आम्हां अनाथाकारणें***
***पंढरी निर्माण, केली देवें.....***

या जगद्गगुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंगाने उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणाची सुरुवात केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या २०२४ - २५ या अतिरिक्त अर्थसंकल्पात एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यात महसूली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये तर, महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये अंदाजित करण्यात आला आहे. वार्षिक योजना कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये आणि अनुसूचित जाती उपयोजनेकरीता १५ हजार ८९३ कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेकरीता १५ हजार ३६० कोटी रुपये तसेच जिल्हा वार्षिक योजनेसाठी १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. महसुली तूट २० हजार ५१ कोटी रुपये, राजकोषीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपये आहे. शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने अनेक निर्णय घेतले असून, "स्वावलंबी शेतकरी, संपन्न शेतकरी" हे ब्रीद जपत शेतकऱ्यांना विविध पातळीवर सहाय्य करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. बी-बियाणांसाठी थेट अनुदान, सिंचन सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतीपूरक उद्योगांना प्रोत्साहन, शेतमालाचे मूल्यवर्धन, शेतमाल साठवणूक, बाजारपेठेची उपलब्धता इत्यादीबाबत विविध योजना राबविण्यात येत आहेत. "नमो शेतकरी महासन्मान निधी योजने" अंतर्गत आजतागायत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान देण्यात आले आहे. "एक रुपयात पीक विमा योजने" अंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा करण्यात आली आहे. "गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने" अंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. "महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने" अंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत. यासाठी चालू अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.



**महिलांना वळवण्याचा केविलवाणा प्रयत्न**

आज मांडलेल्या अर्थसंकल्पाचे एक वैशिष्ट्य असे आहे की त्यांनी राज्यातील महिलांना त्यांच्या बाजूने वळवण्याचा केविलवाणा प्रयत्न केल्याचे चित्र दिसते. 'लाडकी बहीण' अशी योजना त्यांनी जरूर आणावी, परंतु ती आणत असताना मुलगा आणि मुलगी असा भेद करू नये. मुलींसाठी काहीतरी आणत असाल तर मुलांसाठी देखील एखादी योजना आणा. परंतु, त्याबद्दल त्यांच्या अर्थसंकल्पात कुठेही उल्लेख नाही. राज्य सरकारने माता बहिणींना काहीतरी द्यायला हवे. पण त्याचवेळी मी हे देखील म्हणेन की राज्यात लाखो तरुण बेरोजगार असताना त्यांच्यासाठी देखील काहीतरी करावं. कारण हे तरुण घरी गेल्यावर आपल्या माता भगिनींना काय उत्तर देणार आहेत? याचे उत्तर या अर्थसंकल्पात कुठेही दिलेलं नाही. रोजगार वाढीसाठी कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केलेल्या दिसत नाहीत. गेल्या दहा वर्षांमध्ये भारतीय जनता पार्टीने जनतेला खोटी आश्वासनं दिली, त्यांच्या खोट्या आश्वासनांना आणि थापांना कंटाळून महाराष्ट्रातील जनतेने भाजपासह त्यांच्या मित्रपक्षांना लोकसभा निवडणुकीत दणका दिला.



**पोकळ घोषणांचा जुमलेबाज अर्थसंकल्प**

राज्यातील १२ ते १३ जिल्ह्यात अजून पाऊस पडलेला नाही, शेतकरी पावसाची वाट पहात बसला आहे पण मुंबईतील विधिमंडळात मात्र घोषणांचा पाऊस पडला आहे. अर्थसंकल्पात कोणत्या विभागाला किती निधी देणार याचा यात उल्लेख नाही. कृषी, पाटबंधारे, सामाजिक न्याय, गृहनिर्माण अशी विभागवार निधीची तरतूद नसणारा राज्याच्या इतिहासातील हा पहिला अर्थसंकल्प आहे. ज्या घोषणा केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी कितपत होईल याबाबत शंका असून राज्यातील जनतेची दिशाभूल करणारा बोगस, पोकळ घोषणांचा जुमलेबाज अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना वीज बिल माफ करण्याची सरकारची घोषणा फसवी आहे. शेतकऱ्यांच्या थकीत विज बिलाबाबत यात काहीही स्पष्टता नाही. तेलंगणाप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करावी अशी मागणी काँग्रेस पक्षासह महाविकास आघाडीतील पक्षांनीही केली होती पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत.



**'चादर लगी फटने और खैरात लगी बटने'**

आजचा अर्थसंकल्प म्हणजे 'चादर लगी फटने और खैरात लगी बटने' असे म्हणत जयंत पाटील यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. लोकसभा निवडणुकांचा चांगलाच परिणाम राज्यात झालेला दिसतोय. आता पराभव समोर दिसत असताना, आजच्या बजेटमधून शेवटचा प्रयत्न महायुती सरकारने केला आहे. हा प्रयत्न देखील तीन महिन्यांसाठी आहे. अगदी बेजबाबदारपणे मांडलेले हे बजेट आहे. निवडणुकीच्या आधी पेट्रोल डिझेलचे भाव कमी करून मग ते वाढवायचे ही पंतप्रधान मोदींची पद्धत राज्यात राबवली गेली आहे. निवडणुका झाल्या की पुन्हा दल वाढवले जाईल असे म्हणत असताना महाराष्ट्राच्या महिलांना तुम्ही आधार देण्याचा प्रयत्न करत आहात तर तो सक्षमपणे करा. फक्त घोषणा करून ठराविक वर्गाला संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. कसलेही मूल्यमापन न करता हे बजेट सादर केलेले आहे असा ठपकाही त्यांनी ठेवला. एमएससीबीची मागची थकबाकी माफ करणं अपेक्षित असताना पुढची सुपारी घेणं हे जबाबदारपणाचे लक्षण नाही. म्हणून मी वारंवार सांगतोय की, हे बजेट फक्त दोन महिन्यांचे आहे. हे सत्तेतून बाजूला गेल्यानंतर, आम्ही ज्यावेळी सत्तेत येऊ तेव्हा आम्ही जबाबदारीने महाराष्ट्राच्या जनतेला दिलासा देण्याचा काम करू.



- महाराष्ट्राची गौरवशाली आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरा असलेल्या वारकरी बांधवांसाठी 'मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ' घोषित
- पंढरपूर वारीचे जागतिक नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्याची घोषणा
- वारीतल्या मुख्य पालख्यांतील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपयांचे अर्थसाह्य
- 'निर्मल वारी'साठी ३६ कोटींचा निधी



- २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना'
- महिलांना रिक्षा व्यवसायासाठी आर्थिक मदत देणारी 'पिंक ई-रिक्षा' योजना
- ५२ लाख कुटुंबांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी 'मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना'
- महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना
- लघुउद्योजक महिलांना १५ लाख कर्जापर्यंतच्या व्याजाचा परतावा योजना



- ओबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना चालू वर्षापासून अभियांत्रिकी, वस्तुशास्त्र, फार्मसी, मेडीकल, शेतीविषयक सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक आणि परीक्षा शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती
- राज्यातील दहा लाख युवकांना प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण आणि दरमहा दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन देणाऱ्या 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने'ची घोषणा
- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती





- राज्यभरात पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित कर समान करण्याची तरतूद
- व्यवसाय कर, मुद्रांक शुल्काबाबतही दिलासादायक तरतूद



- स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर दरवर्षी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन
- सिंधुदुर्ग येथे ६६ कोटींच्या आंतरराष्ट्रीय पाणबुडी केंद्राची तसेच स्कुबा डायव्हिंग केंद्राची निर्मिती
- बारी समाजासाठी 'संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळा'ची स्थापना
- नवी मुंबईत महापे येथे जेम्स ॲन्ड ज्वेलरी पार्कची निर्मिती

## शेतकऱ्यांसाठी विविध योजना


**नैसर्गिक** आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी जुलै, २०२२ पासून १५ हजार २४५ कोटी ७६ लाख रूपयांची मदत, **नोव्हेंबर** - डिसेंबर, २०२३ मधील अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या २४ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना २ हजार २५३ कोटी रुपयांची मदत, **नुकसानीच्या** क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करुन राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने मदत, **खरीप** हंगाम २०२३ करिता ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ तर १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध सवलती लागू, **नुकसानीचे** पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू, **नमो शेतकरी** महासन्मान निधी योजने' अंतर्गत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान, '**एक रुपयात** पीक विमा योजने' अंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा, '**गोपीनाथ मुंडे** शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने' अंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप, '**महात्मा जोतिराव** फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने' अंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा केले, उर्वरित रकमेचे वाटप त्वरीत, **नानाजी देशमुख** कृषी संजीवनी प्रकल्पाचा ६ हजार कोटी रुपये किमतीचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांत राबविण्यात येणार, **मा.बाळासाहेब** ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पातंर्गत १ हजार ५६१ कोटी ६४ लाख रुपये किमतीच्या ७६७ उपप्रकल्पांना मंजूरी- सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना लाभ, **विदर्भ** आणि मराठवाडयातील १४ विपत्तीग्रस्त जिल्हयातील केशरी शिधापत्रिकाधारक ११ लाख ८५ हजार शेतकरी लाभार्थीना मे २०२४ अखेर ११३ कोटी ३६ लाख रुपये थेट रोख रक्कम अदा, **राष्ट्रीय** कृषी विकास योजना आणि राज्यपुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेतून गेल्या तीन वर्षात २ लाख १४हजार शेती उपकरणांच्या खरेदीसाठी १ हजार २३९ कोटी रुपये अनुदान, '**गाव तेथे गोदाम**' या नवीन योजनेत पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम तसेच अस्तित्वातील गोदामांची दुरुस्ती, **कापूस**, सोयाबीन तसेच अन्य तेलबियांच्या उत्पादकतेत वाढ आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना- सन २०२४ - २५ मध्ये ३४१ कोटी रुपये निधी, **आधारभूत किंमतीनुसार** खरीप व रब्बी हंगामातील कडधान्य व तेलबियांच्या नाफेडमार्फत खरेदीसाठी १०० कोटी रुपयांचा फिरता निधी, **खरीप पणन** हंगाम २०२३ - २४ मध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य, **कांदा उत्पादक** शेतकऱ्यांना सन २०२३ - २४ मध्ये ३५० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे ८५१ कोटी ६६ लाख रुपये अनुदान, **कांदा आणि** कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा फिरता निधी, **खरीप पणन** हंगाम २०२३-२४ मध्ये ६ लाख धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपयांप्रमाणे १ हजार ३५० कोटी रुपये प्रोत्साहन रक्कम प्रदान, **नोंदणीकृत** २ लाख ९३ हजार दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपयांप्रमाणे २२३ कोटी ८३ लाख रुपये अनुदान वितरीत, राहिलेले अनुदानही त्वरित वितरीत करणार, **दूध उत्पादक** शेतकऱ्यांना आधार देण्याकरीता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै, २०२४ पासून पुढे चालू ठेवण्यात येणार, **पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय,** पशुचारा आणि पशुखाद्य उत्पादन या क्षेत्रात नव उद्योजक निर्माण करण्याकरीता नवीन 'दुग्ध व्यवसाय उद्योजकता प्रकल्प' **शेळी-मेंढीपालन** आणि कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन नवीन प्रकल्प, **मत्स्यबाजार स्थापना** तसेच मासळी विक्री सुविधांसाठी ५० कोटी रुपये निधी, **अटल बांबू** समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खाजगी क्षेत्रावर बांबूची लागवड -प्रतिरोपासाठी १७५ रुपये अनुदान, **राज्यातील** पडीक जमीनीवर मोठया प्रमाणात बांबूची लागवड - नंदुरबार जिल्ह्यात १ लाख २० हजार एकर क्षेत्रावर बांबूची लागवड, **वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात** जिवीतहानी-नुकसान भरपाईच्या रकमेत २०लाख रुपयांवरून २५ लाख रुपये, कायमचे अपंगत्व आल्यास ५ लाख रुपयांवरून ७ लाख ५० हजार रुपये, गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजारावरून ५ लाख रुपये, किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपयांवरून ५० हजार रुपये अशी वाढ, **शेती पिकाच्या** नुकसान भरपाईकरिता देय रकमेच्या कमाल मर्यादेतही २५ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये वाढ, **सिंचन प्रकल्प** पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम- १०८ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता -दोन वर्षात ६१ प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित- सुमारे ३ लाख ६५ हजार हेक्टर सिंचन क्षमता महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम- १५५ प्रकल्पांच्या कालवे वितरण प्रणालीची सुधारणा -येत्या तीन वर्षात त्यामुळे सुमारे ४ लाख २८ हजार हेक्टर वाढीव क्षेत्राला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ, विविध अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, वितरण प्रणालीतील सुधारणांसाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे अर्थसहाय्य, **म्हैसाळ** जिल्हा सांगली येथे पथदर्शी सौर ऊर्जा प्रकल्प - अंदाजित किंमत एक हजार ५९४ कोटी रुपये- सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबांना लाभ **स्वच्छ व हरित** उर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई-शिरसाई, पुरंदर यासह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण -४ हजार २०० कोटी रुपये खर्च, **वैनगंगा-नळगंगा** नदीजोड प्रकल्प- नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ, **कोल्हापूर** आणि सांगली जिल्ह्यातील पूरामुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळावी आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने तीन हजार २०० कोटी रुपये किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम जलयुक्त शिवार अभियान-२ अंतर्गत मार्च २०२४ अखेर ४९ हजार ६५१ कामे पूर्ण - ६५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद, '**गाळमुक्त धरण,** गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत एकूण ३३८ जलाशयातून ८३ लाख ३९ हजार ८१८ घनमीटर गाळ काढण्यात आला. ६ हजार शेतकऱ्यांना लाभ. **मागेल त्याला** सौरउर्जा पंप- शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जीकरण करण्याचा १५ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प -८ लाख ५० हजार शेतकऱ्यांना सौरउर्जा पंप उपलब्ध करून देण्यात येणार.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


बहुधा आपल्या फिगरची तिला काळजी असावी. पण त्याच वेळी आपल्या त्या रडणाऱ्या बाळाला घेऊनही तिला चालता आलेच असते ना ! बाळाचीही शारीरिक आणि मानसिक गरज भागली असती आणि व्यायाम सुद्धा घडलाच असता. म्हणून व्यायाम किंवा योग करताना थोडी लवचिकताही असणे गरजेचे आहे. समत्वम योग उच्चते याचे सार किंवा मर्म हेच म्हणता येईल. आपण आपल्या घरच्या माणसांना तरी काही वेळ देतो का ? वयोवृद्ध असणारे आईवडील यांच्याबरोबर केवळ दिवसातील पाच दहा मिनिटे जरी घालवली, तरी त्यांना केवढा आनंद होतो !मनपसंत संगीत ऐकणे, आपली आवडती पुस्तके वाचणे, मित्रांबरोबर वेळ घालवणे, सहलीसाठी जाणे या गोष्टीही आनंद देणाऱ्या आणि आपले मानसिक स्वास्थ्य उत्तम ठेवणाऱ्या आहेत. आपण जर शारीरिक दृष्ट्या सक्षम असू तर आपल्याला कोणासाठी शारीरिक मदत करता येईल, आर्थिक दृष्टया सक्षम असू तर कोणासाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करता येईल. तेही नसेल तर इतरांसाठी थोडा वेळ देता येईल. आपल्या चेहेऱ्यावरचे हास्य, दोन प्रेमाचे शब्द हे तर आपण देऊच शकतो. त्यासाठी काही वेगळे खर्च करण्याची गरज नाही. ज्याला हे साधलं त्याला योग साधला. आज मी जो काही आहे, त्यात सर्वांचा हातभार आहे.




## हितगुज



पुष्प
१०२वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

### देव कोण हे आपोआप कळेल!

ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडते त्या प्रमाणात आपल्याला नामस्मरणाचा अनुभव आला असे समजावे; अखंड नामस्मरण टिकले म्हणजे पूर्णतः अनुभव येतो. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. मी कोण आहे? हे ओळखण्यासाठी वाचेनेच 'श्री स्वामी समर्थ' म्हणण्यास सुरुवात करावी, नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा; मग ते मनातल्या मनात होऊ लागते. देहाचा विसर पडल्यावर 'मी कोण अणि देव कोण' हे आपोआप कळेल.

स्वामी महाराजांच्या नाम जपाचा छंद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते. मोह, लोभ इत्यादी संसारातल्या अडचणी नामस्मरणाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामस्मरणाच्या सातत्याने अभिमान वितळलाच पाहिजे. अडचणी असल्या तरी नामस्मरण करता येते. म्हणून नामस्मरण न करताच, करण्याबद्दल सबबी सांगू नयेत. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस आणि आळसाने सर्वनाश होतो. अखंड नामस्मरण करायला सोवळ्या ओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे. उपासना कोणतीही असली तरी नामस्मरणाशिवाय ती पचनी पडत नाही. निरनिराळ्या देशातले अन्न निरनिराळे असू शकते. पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी सर्वत्र सारखेच. त्याप्रमाणे 'उपासनारुपी अन्नाला पचविण्यासाठी नामस्वरुपी पाण्याची गरज आहे.' आयुष्यात कसाही प्रसंग असला तरी नामस्मरण करावे. श्री स्वामी महाराज नक्की हात देतील.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

तेव्हा सरस्वती बाहेर आली. तिने त्यास आसनावर बसविले आणि भिक्षा घातली. नंतर आपली सर्व हकीगत सांगून संतति नसल्याने



दिलगीर आहे, असे त्यास सुचविले आणि काही उपाय असला तर सांगावा; म्हणून विनंति करून ती त्याच्या पाया पडली. तेव्हा मच्छिंद्रनाथास तिची दया आली. मग त्याने सूर्यमंत्राने विभूति मंत्रून ते भस्म तिला दिले आणि सांगितले की, हे भस्म रात्रीस निजतेवेळी खाऊन नीज. हे नुसतेच भस्म आहे, असे तू मनात आणू नको, हा साक्षात हरिनारायण जो नित्य उदयास येतो तो होय ! तो तुझ्या उदरी येईल, त्या तुझ्या मुलास मी स्वतः येऊन उपदेश करीन; तेणे करून तो जगात कीर्तिमान निघेल. सर्व सिद्धि त्याच्या आज्ञेत राहतील. असे बोलून मच्छिंद्रनाथ जावयासाठी उठले असता, तुम्ही पुन्हा परत कधी याल म्हणून तिने त्यास विचारले. तेव्हा मी बारा वर्षांनी परत येऊन मुलास उपदेश करीन असे सांगून मच्छिंद्रनाथ निघून गेले. सरस्वतीबाईस भस्म मिळाल्यामुळे अत्यंत हर्ष झाला होता. ती राख तिने आपल्या पदरास बांधून ठेविली. मग ती आनंदाने शेजारणीकडे बसावयास गेली. तेथे दुसऱ्याही पाच-सात बायका आल्या होत्या व संसारासंबंधी त्यांच्या गोष्टी चालल्या होत्या. त्यावेळी तिनेहि आपल्या घरी घडलेला सर्व वृत्तांत त्यास सांगितला आणि त्या कानफाड्या बाबाने सांगितल्याप्रमाणे मी भस्म खाल्ले असता, मला पुत्र होईल काय म्हणून विचारले. तेव्हा एकजणीने तिला सांगितले की, त्यात काय आहे? असल्या धुळीने का पोरे होतात? तू अशी कशी त्याच्या नादी लागलीस कोण जाणे? आम्हाला हे चिन्ह नीट दिसत नाही. अशा तर्हेने त्या बायांनी तिच्या मनात किंतु भरविल्यामुळे ती हिरमुसले तोंड करून आपल्या घरे गेली व गाईच्या शेणाच्या गोठ्यात त्या उकिरड्यात तिने ते भस्म टाकून दिले. बारा वर्षानंतर जेव्हा मच्छिंद्रनाथ चंद्रगिरी गावात सरस्वतीच्या घरासमोर जाऊन उभे राहिले. त्यांना पाहून सरस्वती बाहेर आली. तिने नाथांना ओळखले. "मुलगा कुठ आहे?" नाथांनी विचारले. "मला मुलगा झालाच नाही." तिने सांगितले. "खोट बोलू नकोस! मी तुला १२ वर्षा पूर्वी जे भस्म दिले होते त्या भस्माचे काय झाले?" नाथांनी प्रश्न केला. "मी ते गाईच्या शेणाच्या गोठ्यात टाकले. असे ऐकल्यावर नाथांना क्रोध येतो. त्यावेळी ती स्त्री नाथांची माफी मागते. योगीराज, मला क्षमा करा!". त्यावेळी नाथ म्हणतात, मला ती जागा दाखव. तिने नाथांना ती जागा नेऊन दाखविली. त्यावेळी सदगुरु मच्छिंद्रनाथ म्हणतात, "हे प्रतापवंता, हरिनारायणा, सूर्यसूता तू जर गोवऱ्यात असलास तर बाहेर ये!". "गुरुराया, मी इथे आहे. गोवऱ्यांची रास मोठी आहे. तुम्ही मला बाहेर काढा."मच्छिंद्रनाथांनी लगेच खाच उकरून त्या मुलास बाहेर काढले. तो तेजःपुंज पुत्र बाहेर येताच सूर्यासारखा प्रकाश पडला. सरस्वतीला पश्चाताप झाला. मच्छिंद्रनाथ त्या मुलास आपल्याबरोबर घेऊन गेले. व गाईच्या शेणाच्या राक्षेतुन जन्म झाला म्हणुन त्यांचे गोरक्षनाथ असे त्याचे नाव ठेवले.



आधुनिक केसरी

### ज्ञान टाळकरी | झंकारते ||

घडोघडी छंद | नामाचा जडावा ||
कर्माशी जोडावा | भाव शुद्ध ||१||
नसावा अधम | विचार मनाचा ||
आचार हिताचा | आचरावा ||२||
टाळावा सदैव | असंगाशी संग ||
घडावा सत्संग | क्षणोक्षणी ||३||
अंतरीचे धावे | जाणोनिया घ्यावे ||
स्थितप्रज्ञ व्हावे | लोकांतात ||४||
शब्द पंढरीचा | होता वारकरी ||
ज्ञान टाळकरी | झंकारते ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

शक्तिची दोन रूपे आहेत. 1/स्थिर रूप 2/गतीमान रूप स्थिर रूपात ती संपूर्ण विश्वाला अनंतकाळ टिकवून धरते. तर गतिमान रूपात ती विश्व निर्माण करून त्यामध्ये वेगवेगळ्या घडामोडी घडवून आणते. शक्ति ही जाणीव संपन्न आहे. म्हणजेच मूळमायेचे रूप जाणीव रूप आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

जाणीव ही अत्यंत शांत ,स्थिर,ज्ञानमय,अनंत व आनंदी स्वरूपाची असते. तिच्या अस्तित्वाची जाणीव आनंद निर्माण करून देत असते. जाणीव रूपातील तिचे अस्तित्व कधी दिसते तर कधी दिसत देखिल नाही. शक्ति जाणीव रूप असते हे दाखवताना समर्थ आपल्याला तिचे वर्णन सांगतात. मूळमाया जाणीव रूप आहे. स्वस्वरूप हे जाणीवेने मूळ ठिकाण असून तिथे ती सहज रहाते. स्वस्वरूपी लीन असणारी जाणीव शांत व स्तब्ध असते. तर विश्वा मध्ये ती गतिमान होऊन कर्तृत्व गाजवते. आपण याच्या आधीच्या लेखात म्हणलेलं आहे की जाणीवेचे रूप कधी दिसते तर कधी दिसत नाही. आत्ता बघा ना मित्रांनो नुकताचं उन्हाळा संपून पावसाळ्याची सुरुवात झाली. पावसाचे पाणी कधी उफाळून वर येते तर कधी पाणी नाही म्हणून जनता पण त्रस्त होते.कधी पाण्याचा प्रवाह आडवला जातो. त्याच प्रमाणं जाणीव कुठे गुप्त होते तर कुठे प्रगट होते. जाणीव नेणीव स्थिर व गतीमान आहे. ह्या दोन्हीही निसर्ग चक्राच्या दोन बाजू आहेत. मित्रांनो आपण एकविसाव्या शतकात वावरणारी माणसं आहोत. हवं गरम होतेय म्हणलं की आपण पंखा,कुलर लावतो. पाऊस आला तर त्या पासून रक्षण करत. थंडी वाजली तर शाल,स्वेटर घालून आपल्या शरीराचं रक्षण करतो. एवढंच काय रूम हिटरने घर गरम पण करू शकतो. ही सर्व वायुची रूपे आहेत. वायु ची रूपे आपल्याला त्यांच्यातील खेळ आपल्याला अशा प्रकारे दाखवतात. विश्वाच्या व्यवहारात जिकडे तिकडे शक्तिचा खेळ चाललेला आहे. शक्ति ही अनादी अनंत आहे. शक्तिची दोन रूपे आहेत.

## पुण्यतिथी कशी साजरी करावी ?

आधुनिक केसरी

सत्पुरुषाची पुण्यतिथी कशी साजरी कराल ? या दिवशी जो नेम कराल तो सतत टिकण्यासारखा असतो. म्हणून आजपासून नामाशिवाय बोलायचे नाही असे आधीच ठरवा. नामांत राहण्याचा प्रयत्न करा, म्हणजे इथे आल्यासारखे काही केल्याचे श्रेय तरी मिळेल. इथे जो जो म्हणून आला त्याच्याजवळ आपण रहावे असे मला वाटते, पण तुम्हीच दार लावून ठेवले तर मी काय करणार ? पाहुणा घरी आला आणि त्याला दार उघडलेच नाही, तर तो काय करणार ? तसे, विषयात राहून दारे बंद करून ठेवू नका. नामाचा उच्चार कंठी ठेवा, म्हणजे विषयाचा घाला होणार नाही. आता कली मातत चालला आहे; त्याचा घाला चुकवायचा असेल तर नामावर विश्वास ठेवा. कोणीही काहीही सांगितले तरी नाम सोडू नका. जसे पाण्याचा मोठा लोंढा चालू झाला की एखाद्या स्थिर झाडाला दोराने बांधून ठेवलेली वस्तू वाहून जात नाही, तसे तुम्ही नामाची कास घट्ट धरलीत म्हणजे काळ काही करू शकणार नाही.



समर्थांनी नामाच्या समासात सांगितले आहे तसे, नाम हेच रूप असे समजून नाम घेत चला, म्हणजे रूप दिसेल. भगवंत हा आपल्या आतमध्ये प्रकट व्हायचा असल्यामुळे, नामस्मरणाच्या योगाने तो हळूहळू प्रकट होत जाणे हेच खरे हिताचे आणि कायमचे असते. डोक्यावर हात ठेवून चमत्कार होणे, काहीतरी तेज दिसणे, दृष्टांत होणे, इत्यादि गोष्टी तात्पुरत्या असतात. एखादा अशक्त, हाडकुळा मनुष्य लठ्ठ होण्यासाठी 'अंगाला सूज येऊ दे ' असे म्हणाला तर ते वेड्यासारखे होईल; याच्या उलट, त्याने नीट औषध घेतले तर तो कदाचित् लठ्ठ होणार नाही, पण त्याचे शरीर मात्र घट्ट होईल. तसेच परमार्थाच्या अनुभवाचे आहे; आणि हा अनुभव वाढीला लागावा याकरिताच पुण्यतिथी साजरी करावी. नामस्मरण सतत केल्याने आज ना उद्या भगवंताचे प्रेम येईलच येईल. प्रपंचाच्या गर्दीमध्ये भगवंताचे स्मरण ठेवण्यासाठी उत्सव, सण, पुण्यतिथ्या वगैरे असतात. खरोखर, प्रापंचिकाला कितीतरी पाश आहेत ! पैसा, लौकिक, मुले, मित्र, आप्त, वगैरे सर्व पाशच आहेत. अशा अनेक पाशांमध्येही नाम आवडीने घेणे किती कठीण आहे ! त्यामध्ये टिकणारा मनुष्य चांगला भक्कम असला पाहिजे. नामाच्या मागे भगवंताचे अस्तित्व आहे. म्हणून नामात सत्संगतीही आहे. मोबदल्याची अपेक्षा न करता मनापासून नाम घ्यायचे, आजच्या दिवसापासून ठरवा.

**१८१. संतांचे अस्तित्व त्यांच्या देहात नसून त्यांच्या वचनात आहे.**

## निरूपण

आधुनिक केसरी

हे तूं जाण मावेचीं । आवघीं सोइरीं सुखाचीं ।
हे तुझ्या सुखदुःखाचीं । सांगाती नव्हेती ॥ ४६ ॥
कैंचा प्रपंच कैंचे कुळ । कासया होतोसी व्याकुळ ।
धन कण लक्ष्मी सकळ । जाइजणें ॥ ४७ ॥
कैंचें घर कैंचा संसार । कासया करिसी जोजार ।
जन्मवरी वाहोन भार । सेखीं सांडून जासी ॥ ४८ ॥
कैंचें तारुण्य कैंचे वैभव । कैंचें सोहळे हावभाव ।
हें सकळहि जाण माव । माईक माया ॥ ४९ ॥
येच क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी ।
माझें माझें म्हणतोसी । म्हणौनियां ॥ ५० ॥
तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ।
स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष ॥ ५१ ॥
कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं ।
तें तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ॥ ५२ ॥
तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार ।
आतां येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें ॥ ५३ ॥
येका दुर्भराकारणें । नाना नीचांची सेवा करणें ।

शनिवार, २९ जून २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २९५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 29 JUNE 2024 | adhunikkesari.com | • YEAR-03 • ISSUE-295 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# बैल नसल्याने भाऊ अन् मुलाला कोळप्याला जुंपले

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी अवघ्या 48 तासांतच पाठवली बैलजोडी

आधुनिक केसरी न्यूज

**गोपाल सातपुते**

**हिंगोली :** पाचवीला पुजलेला दुष्काळ, कायम नापिकीचे संकट, कधी अवकाळी, गारपीटीने हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेला, अशा आस्मानी आणि सुलतानी संकटाला राज्यातला बळी राजा कायम तोंड देत असतो. अल्पभूधारक शेतकऱ्याची अवस्था तर अधिकच बिकट होत आहे. एकर-दोन एकरमध्ये पेरणी करायची आणि त्यात उगवेल त्यावर संसाराचा गाडा हाकायचा, अशी तारेवरची कसरत हजारो शेतकरी करताना दिसतात. अनेकदा पेरणी, नांगरणीसाठी बैल नाही म्हणून कुटुंबातीलच कोणी तरी खांद्यावर जू घेऊन पेरणी करतो हे चित्रही अनेकदा समोर येते. अशाच एका हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्याने हळद लगावड करण्यासाठी बैल जोडी नसल्याने आपल्या भावाला आणि मुलाला जुंपून लागवड केल्याचा प्रकार दोन दिवसापूर्वी समोर आला. राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी खासगी वृत्तवाहिनीत ही बातमी समजतात अवघ्या 48 तासांत या शेतकऱ्याच्या बांधावर बैलजोडी पाठवली. बैलजोडी मिळाल्यानंतर या शेतकऱ्याच्या डोळ्यात आनंदाश्रू आणि चेहऱ्यावर समाधान होते. धनंजय मुंडे यांनी स्वतः आपल्या फेसबुक पेजवर या संदर्भात माहिती दिली. हिंगोली जिल्ह्यातील शिरळे ता.वसमत येथील शेतकरी बालाजी पुंडगे यांनी दोन दिवसांपूर्वी त्यांच्या शेतात हळद लावण्यापूर्वी सरी काढताना बैल उपलब्ध नसल्याने आपला भाऊ व मुलाला कोळप्याला जुंपलेला एक व्हीडिओ साम टिव्हीच्या माध्यमातून माझ्या पाहण्यात आला. हे चित्र पाहून मन उदास झाले होते. दोन एकर शेती असलेल्या बालाजी पुंडगे यांना आज माझ्यावतीने त्यांच्या शेतात बांधावर बैलजोडी भेट दिली आहे.

> माझ्यावतीने माझे सहकारी बी .डी . बांगर यांनी बालाजी यांच्या शेतात बैलजोडी पोहोच केली . त्याचबरोबर त्यांना कृषी विभागाकडे ट्रॅक्टरसाठी अर्ज करण्यासही सांगितले आहे . अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या व्यथा, निसर्गाची अवकृपा या सगळ्या चक्रात हे सरकार सर्वार्थाने शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यासाठी कटीबद्ध आहे, अशी ग्वाही धनंजय मुंडे यांनी या निमित्ताने दिली .



# महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सव

## उदय सामंत यांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** या वर्षापासून देशातील पहिला आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सव मुंबई किंवा पुणे येथे आयोजित केला जाईल, अशी घोषणा उद्योगमंत्री तथा नाट्य परिषदेचे विश्वस्त उदय सामंत यांनी केली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेतर्फे गुरुवारी आयोजित पुरस्कार प्रदान सोहळा सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी प्रसारमाध्यमांशी त्यांनी संवाद साधला. शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. जब्बार पटेल यांनी महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सव महाराष्ट्रात झाला पाहिजे, अशी मागणी चर्चेत केली होती. अखिल भारतीय नाट्य परिषदेच्यावतीने त्याचे आयोजन व्हायला हवे, ही त्यांची अपेक्षा मान्य करण्यात आली. आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सव पाच की सात दिवसीय तसेच अन्य बाबी निश्चित करण्यासाठी लवकरच समिती जाहीर केली जाईल. या माध्यमातून देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवास सुरुवात होईल, असे सामंत यांनी सांगितले. लोककला जपण्यासाठी १५ ते २५ वयोगटातील युवक तुतारी वाजविण्याचा व्यवसाय करतात. त्यांचे निश्चितपणे कौतुक आहे. तथापि, लोककला जपत असताना त्यांनी केवळ तुतारी वाजवावी, प्रचार करू नये असा सल्ला सामंत यांनी दिला.

# पावसाने तारांबळ

आधुनिक केसरी न्यूज


**बाजार सावंगी :** बाजार सावंगी येथील आठवडी बाजारात दि.२८ दुपारी अचानक पाऊस आल्याने तारांबळ उडाली. सकाळ पासून सुरुळीत सुरु असलेले बाजार व्यवहार पावसामुळे व्यत्यय आले.आज आठवडी बाजारात हिरव्या पालेभाज्याची आवक कमी आल्याने बाजार महागच होता. त्यात दुपारी बाजार भरल्या नंतर पावसाने फटका दिल्याने व्यवहारांवर परिणाम झाला.ग्राहक वाढले परंतु माळवा पावसाने भिजला व व्यापाऱ्यांना घरी जाण्याचे पडले यात येईल तसे ग्राहक करून माळवा विक्री करण्यात आला.



## ओवेसींची आगपाखड

आधुनिक केसरी

खासदार असदुद्दीन ओवैसी यांच्या घराला काही लोकांनी काळे फासल्याची घटना घडली. दिल्लीतल्या त्यांच्या निवासस्थानाला काळे फासण्यात आले. दोन दिवसांपूर्वी ओवैसी यांनी खासदारकीची शपथ घेताना जय पॅलेस्टाईनचा नारा दिला होता. त्याचा निषेध नोंदवण्यासाठी हे घडलं असावं अशी शक्यता आहे. या घटनेवरुन ओवैसींनी भाजपाला टोला लगावला. एवढेच नाही तर भ्याड सावरकरांप्रमाणे वागू नका अशी आगपाखडही ओवैसींनी केली आहे. लोकसभेचे पहिले अधिवेशन २४ जूनपासून सुरू झालं असून सध्या नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी सुरू आहे. या शपथविधीदरम्यान आतापर्यंत अनेक खासदारांनी शपथ घेतली आहे. यावेळी कुणी देवाचे नाव घेऊन शपथीला सुरुवात केली, तर कुणी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांचे नाव घेत खासदारकीची शपथ घेतली. मात्र ओवैसी यांनी शपथ घेताच 'जय पॅलेस्टाईन' असा नारा दिला. त्यामुळे अनेकांनी भुवया उंचावल्या. तसंच त्यांचा निषेधही काही जणांनी नोंदवला. तर संजय राऊत यांनी त्यांची पाठराखण करत या नाऱ्यात गैर काय असा प्रश्न विचारला. या घटनेला दोन दिवस उलटण्याच्या आतच ओवैसींच्या घराला काळे फासण्यात आले. त्यावर आता ओवैसींनी भाजपाला टोला लगावला. माझ्या दिल्लीतल्या निवासस्थानाला काही अज्ञातांनी काळे फासले. दिल्लीतले माझे घर कितीवेळा टार्गेट केले गेले याची गणतीच मी विसरलोय. दिल्ली पोलीस अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून हा प्रकार घडला आहे. त्यांच्याकडे गेलो की ते हतबलता व्यक्त करतात. अमित शाह यांच्या तुमच्या निर्देशांनी हे घडतंय का? ओम बिर्लांनी हे स्पष्ट करावे की, दिल्लीत खासदार सुरक्षित नाहीत, असे म्हणत ओवैसींनी संताप व्यक्त केला. दोन गुंड आहेत, ते माझ्या घरावर असे भ्याड हल्ले करतात. मात्र मी यामुळे घाबरणार नाही. सावरकरांप्रमाणे भ्याड वागणं सोडा. हिंमत असेल, पुरुष असाल तर माझ्या समोर या. दगफेक करुन, काळे फासून पळून जाऊ नका, असे आव्हानही ओवैसींनी दिले आहे. असदुद्दीन ओवैसी ज्यावेळी शपथ घेण्यासाठी आले, तेव्हा राधा मोहन सिंह हे पीठासीन अधिकारी म्हणून काम बघत होते. यावेळी त्यांनी असदुद्दीन ओवैसी यांना खासदाराकीची शपथ दिली. मात्र, त्यांनी शपथ पूर्ण करताच, 'जय भीम', 'जय मीम', 'जय पॅलेस्टाईन' असा नारा दिला. त्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. तसेच भाजपाच्या खासदारांनी याचा जोरदार विरोध केला. त्यानंतर आता त्यांच्या घराला काळे फासण्याची घटना घडली. या घटनेनंतर ओवैसींनी संताप व्यक्त केला आहे.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

## नैतिक शिक्षणाची गरज

आधुनिक केसरी

गेल्या काही महिन्यांतील दोन घटना नी समाजात वादळ निर्माण केले.पहिली पुणे येथील दारू पिलेल्या अल्पवयीन मुलाच्या हातून घडलेला कार अपघात.दुसरा नीट परीक्षेत मुलं,पालक यांनी भ्रष्टाचार करून पैकीच्या पैकी गुण मिळवण्याचा विक्रम! दोन्ही घटना त पालकाची पूर्ण साथ आहे.मुलांना संरक्षण आहे.गुन्ह्यात सक्रिय सहभाग आहे.या प्रकारच्या घटना चे प्रमाण वाढते आहे.किंबहुना लाच देऊन हवे ते मिळवणे,हवा तो कार्य भाग साधून घेणे हा जगण्याचा एक भाग झाला आहे.ते इतके कॉमन झाले आहे की अशा घटना कितीही गंभीर असल्या तरी त्याचे कुणाला काही वाटेनासे झाले आहे.आपल्या समाजाची कातडी इतकी निबर झाली आहे.

अगदी बलात्काराच्या निर्घृण कृत्याचे पडसाद काही दिवस उमटतात, मीडियात चघळले जातात अन् काळाच्या पडद्याआड त्याच वेगाने लुप्त देखील होतात.पब्लिक मेमरी इज शॉर्ट असे म्हणतात! हे प्रकार गेल्या काही दिवसात कमी होण्या ऐवजी वाढतच चालले आहेत ही खरी चिंतेची बाब. म्हणजे मागे करोना विषाणू ने जसे अख्खे जग हादरले तसे या घटनांनी समाज मन मुळापासून हादरले असे होताना दिसत नाही.आता तर चलता है या मनोवृत्ती पर्यंत आपण स्थिरावलो आहोत. हे आधीही घडत होते. समाज स्फटिकासारखा स्वच्छ कधीच नव्हता.आता सोशल,इलेक्ट्रोनिक मीडिया मुळे घटना अती वेगाने व्हायरल होतात एव्हढेच. एकीकडे आपण समज खूप सुधारला,जीवनमान बरेच उंचावले, बरीच तांत्रिक ,शैक्षणिक प्रगती झाली असे दावे करतो.अन् दुसरीकडे प्रत्यक्षात घडणाऱ्या घटना काही वेगळेच विपरीत चित्र निर्माण करताना दिसतात.

हा विरोधाभास लक्षणीय आहे. सर्वच स्तरावर ही नैतिकता इतक्या प्रमाणात कशी काय घसरत चालली ?या वाहत्या गटारात सगळेच हात धुऊन घेताना दिसतात. प्रत्येकाला सारे सुख,यश, पैसा, मान सन्मान इन्स्टंट हवे आहे.त्यासाठी काहीही किंमत मोजण्याची तयारी आहे. पेशंस नाहीत,परिश्रम नाहीत.. साधना नाही. उपासना नाही.तातडीने अंतिम रिझल्ट हवेत.


डोनेशन देऊन गुणवत्ता,लायकी नसलेला मुलगा किंवा मुलगी कसल्या प्रकारचे डॉक्टर इंजिनिअर होणार आहेत? ते समाजाला कसले योगदान देणार आहेत? शिक्षणातले खाजगी करण,व्यापारीकरण आता अगदी खालच्या पातळीवर पोहोचले आहे.एखादी व्यक्ती वरवर आलवेल दिसत असली तरी ती आतून कॅन्सर ने पोखरली असावी तसा प्रकार आहे! आपण गणित विज्ञान,इतिहास,भूगोल, कला हे सारे शिकतो,पदव्या घेतो त्याचा नेमका उपयोग काय? मुळात आपल्यात समाजभान नसेल, राष्ट्रा विषयी आदरभाव नसेल,आपल्या कृतीने आपण भवती कसला संसर्गजन्य रोग पसरवतोय याचे भान नसेल तर आपण कितीही शिकलो असलो,कितीही धनवान असलो तरी त्याचा कुणाला काहीच फायदा नाही.कारण आपल्याला कुठेही नैतिकता शिकवली जात नाही. साधना,निष्ठा,प्रामाणिकपणा,सत्यम शिवम सुंदरम ही संकल्पना,कायद्याचे भान,संविधाना बद्दल आदर..यातले काहीच शिकवले जात





नाही.ना घरात,ना शाळा कॉलेजात..नैतिक मूल्यांचे महत्त्वच कुणाला माहिती नाही..मग शिकवणे राहिले दूर.सगळीकडे थिल्लरपणा वाढला आहे.कुणाला कसची भीती उरलेली नाही.मी,आम्ही,आमची जात,आमचा धर्म अशी लहान त्रिज्येची वर्तुळे..त्यातच आपण गिरक्या घेत फिरणार.हे फक्त आपल्याच राज्यात,आपल्याच देशात,चालले आहे असे काही नाही.कमी अधिक प्रमाणात सगळी कडे हीच विदारक परिस्थिती आहे.

आता पर्यंत बऱ्याच चळवळी झाल्यात.. बऱ्याच काळ चालल्यात..काही यशस्वी झाल्या.काही फसल्या.आता यापुढे समाजात नैतिक स्वच्छतेची चळवळ उभारणे गरजेचे आहे.नैतिकतेची चाड असणाऱ्या ,राष्ट्रहिताची काळजी असणाऱ्या सुशीक्षितानी,निवडक समाज सुधारकांनी याबाबतीत पुढाकार घेऊन घरा घरात,समाज घटकात,शाळा कॉलेजात या बाबतीत जन जागृती करणे गरजेचे आहे. हा परीक्षे साठीचा क्रेडिट कोर्स असू शकत नाही. इथे परीक्षा आचरणात आहे.वागण्या बोलण्यात आहे.संस्कारात आहे.फक्त रोप लावून काम भागणार नाही.ते सिंचावे लागेल. त्याची नियमित निगा राखावी लागेल. कळ्या फुले येईपर्यंत, पूर्ण वृक्ष बाहेर पर्यंत त्याला जपावे लागेल. हे समाजकार्य सोपे नाही. कठीण आहे.पण अशक्य ही नाही!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

## आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी. व्ही. नरसिंहराव

आधुनिक केसरी

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज १०३ वि जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता.

तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# पिकांची वाढ जोमात; निंदणी, खुरपणीला आला वेग

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये मधे खरिप पिकांची जोमदार वाढ होत असून कोळपणी, वखर मारणे, निंदणीखुरपणे कामांना वेग आला आहे. महसूल मंडळ परिसर सर्कलमध्ये मृग नक्षत्राची लागवड पेरा असुण खरिप पिकांची उगवणी जोरदार होवून सद्या जोमदार वाढ होत असल्याचे चित्र आहे. तर यंदा कापसाची लागवड कमी असुण यंदा शेतकऱ्यांनी कापसासह मका सोयाबीन बाजरी ज्वारी भुईमूग तुर मुग उडीद पिके शेतकऱ्यांनी घेतली असुण गत दोन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने पिक अंतर्गत मशागत कामांना वेग आला आहे.आता पिकांना खते मारण्याची वेळ आली असुण तद्नंतर खरिप पिकांची वाढ अतिवेग जोरात होईल रोहिणी नंतर मृग व आर्द्राचा पाऊस परिसरात असुण सोडधर पणे सुरु आहे. तर शेवटच्या टप्प्यात मृग नक्षत्राच्या पावसाने हुलकावणी दिली होती. तदनंतर आर्द्रा पाऊस झाला. सद्या सुरु आहे.व चार जुलै पर्यंत नक्षत्र रहाणार आहे.

# कंधार शहरात अनधिकृत अतिक्रमण हटवले! रस्त्याने घेतला मोकळा श्वास!

## अतिक्रमण धारकांना नगरपरिषदचा दणका

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** नगर परिषद प्रशासनाने दि.२७ जून २०२४ रोज गुरुवारी दुपारी जेसीबी मशीनच्या साह्याने पंचायत समिती कार्यालय, महाराणा प्रतापसिंह चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अतिक्रमण हटवून अतिक्रमण धारकांना मोठा दणका दिल्यामुळे अखेर मुख्य रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे, त्यामुळे वाहनधारकासह पादचाऱ्यामधून आनंद व्यक्त केला जात आहे.

कंधार पंचायत समिती कार्यालयासमोर मुख्य रस्त्यावर काही अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण करून आपला व्यवसाय थाटला होता, त्यामुळे मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनास व पादचाऱ्यास वारंवार अडथळा निर्माण होत होता, ही बाब शहरातील काही जागरूक नागरिकांनी तोंडी व लेखी निवेदनाद्वारे नगरपरिषदेच्या प्रशासनास लक्षात आणून दिली होती. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने वारंवार अतिक्रमण धारकांना तोंडी सूचना देऊनही सदरील अतिक्रमण काढून घेत नसल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने ठोस भूमिका घेत दि.२७ जून २०२४ रोज गुरुवारी दुपारी जेसीबी मशीनच्या सहाय्याने व पोलीस बंदोबस्तात सदरील अतिक्रमण हटविले. त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्याने व कंधार पंचायत समिती कार्यालयाने मोकळा श्वास घेतल्याचे दिसून येत आहे.

कंधार चे तहसीलदार तथा नगरपरिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी रामेश्वर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण हटाव पथक प्रमुख दीपक झाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद कर्मचारी राजेश जोंधळे, राहुल खोडसकर, हरिदास कळसकर, बशीर पठाण, जमीर मोहम्मद, अझहर शेख, राकेश जोंधळे, सचिन म्हेसन्ना, श्रीकृष्ण वाघमारे, दिलीप कांबळे, सिद्धार्थ कांबळे, अब्दुल खादर, शेख जगन्नाथ निकम आधी सहनगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.





# मनपावर समाजवादी पार्टीचा हल्लाबोल

## वाढीव घरपट्टी, बेरोजगारीबाबत आयुक्तांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** समाजवादी पार्टीतर्फे महानगरपालिका आयुक्त यांना वाढीव घरपट्टी व बेरोजगारी संदर्भात निवेदन देण्यात आले ह्या निवेदनात असे म्हटले आहे की धुळे महानगरपालिकेतर्फे यावर्षी पालिका हद्दीतील रहिवासी यांना जुने बांधकामाला नवीन बांधकाम प्रमाणे घरपट्टी आकारण्यात येत आहे. धुळे शहरातील सामान्य नागरिकांना कुठल्याही प्रकारचे व्यवसाय, धंदे नाहीत. भागात गटारी नाहीत, जेथे गटारी आहेत तेथे साफ सफाई केली जात नाही. महिना महिना गटारी साफ केल्या जात नाही १५ दिवस घनकचरा उचलला जात नाही असा आरोप या निवेदनात करण्यात आला. नागरिकांना ८ दिवसा आड पाणी मिळत आहे. आणि वर्षाची पाणीपट्टी आकारण्यात येत आहे. तसेच शहरात मोठ्या प्रमाणात मजूर वर्ग आहे, ३००-४०० रुपये मजुरीवर काम करीत आहेत. धुळे शहरात कुठलेही उद्योग धंदे नाहीत, गरीब नागरिकांना मजूरी नाही, त्यांचे अन्न पाणी मिळविण्यासाठी दुसरीकडे जावे लागत आहे, मागील एक वर्षात २००० घरगुती पावरलूम बंद झाले आहेत, त्यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.. हे गरीब नागरिक एवढ्या मोठ्या प्रमाणात घरपट्टी कुठून भरतील? सदर वाढीव घरपट्टी नागरिकांवर अन्यायकारक असून सदर वाढीव घरपट्टी कमी करण्यास विनंती आहे अन्यथा समाजवादी पार्टी तर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल याची सर्व जबाबदारी आपल्या वर राहील असे या ठिकाणी सांगण्यात आले . तरी सदर बाबतीत आपण गांभीर्याने लक्ष देवून वाढीव घरपट्टी कमी करावी अन्यथा आम्ही आपल्या कार्यालयात जन आंदोलन करण्यात येईल असा इशारा या ठिकाणी देण्यात आला.

# चिखली बुद्रुक येथे श्रीविठ्ठल रुक्मिणी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**बोदवड :** तालुक्यातील चिखली बुद्रूक येथे नव्यानेच बांधण्यात आलेल्या श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा दि. 28 ते 30 जून 2024 रोजी आयोजित करण्यात आला आहे. श्रीक्षेत्र मेहूण-चिंचोल येथील श्रीयज्ञेश्वर आश्रमाचे अध्यक्ष हभप शारंगधर महाराज मेहूणकर यांच्या प्रेरणेने, हभप लक्ष्मण महाराज चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामस्थांच्या अनमोल सहकार्यातून श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर उभारले आहे. स्व. शालिग्राम टिल्लूजी पाटील यांनी मंदिरासाठी जागा दान दिली असून स्व. सुरेश विश्वनाथ पाटील यांच्या स्मरणार्थ त्यांची कन्या योगिता पाटील यांच्यातर्फे श्रीविठ्ठल रुक्मिणी मूर्ती सप्रेम भेट देण्यात आल्या आहेत. दि. 28 रोजी दुपारी चार वाजता भव्य मिरवणूक, दि. 29 रोजी सकाळी सात वाजेपासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत होमहवन, यज्ञ, महापूजा, महाआरती समारंभ चालणार आहे. सायंकाळी हरिपाठ व रात्री हभप लक्ष्मण महाराज चिखलीकर यांचे कीर्तन होईल. दि. 30 रोजी पहाटे काकडाआरती, उत्तरपूजा व त्यानंतर सकाळी नऊ वाजता कलशपूजन, कलश स्थापना, ध्वजारोहण व श्रीविठ्ठल रुक्मिणी मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. सकाळी दहा वाजता हभप शारंगधर महाराज मेहूणकर यांचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसाद वितरित केला जाणार आहे. गेल्या पंचवीस वर्षापासून प्रतिक्षित असलेले श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर उभारण्यात आले असून त्यात मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होत आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वीतेसाठी समस्त ग्रामस्थ मंडळी चिखली बुद्रूक परिश्रम घेत आहेत.



# अभिवादन संवाद दौऱ्याला उस्फूर्त प्रतिसाद

## ओबीसी समाजाच्या वतीने प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांचे जंगी स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**बी.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** राज्यभरात काढण्यात येणाऱ्या ३ दिवशीय अभिवादन दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी ओबीसी संघर्ष योद्धा लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी दि.२७ गुरुवार रोजी जिंतूर येथे सकल ओबीसी संवाद यात्रेच्या निमित्ताने मार्गदर्शन केले. ओबीसीच्या मागणीसाठी वडीगोद्री येथे प्रा.लक्ष्मण हाके व त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे यांनी उपोषण केले. सरकारने मागण्या मान्य करण्याचे आश्वासना नंतर दहा दिवसांनी उपोषण स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी बुधवारपासून सुरू केलेला अभिवादन संवाददौरा जिंतूर येथे आले असता त्यांच्या संवाद यात्रेची सकल ओबीसी समाजाच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी जेसीबी द्वारे फुलांची उधळण करण्यात आली. या संवाद यात्रेदरम्यान बोलताना नवनाथ वाघमारे यांनी सरकारवर घनाघात करत मराठा समाजाच्या आंदोलनाची सुरुवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राजेश टोपे यांनीच केली असल्याचा आरोप यावेळी बोलताना केला. पुढे बोलताना म्हणाले की मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण



दिल्यास राजकीय पक्षातील लोकांनाच याचा फायदा घेण्यासाठीच हे मोठे षडयंत्र आहे. यामुळे ओबीसी बांधवांनी आपली ताकद राज्य सरकारला दाखवून धडाच शिकवावा लागेल असे यावेळी बोलताना म्हणाले. दरम्यान यावेळी बोलताना प्रा.लक्ष्मण हाके म्हणाले की, सरकार सगे सोयरे अंमलबजावणीची कुठल्याही प्रकारचा आदेश काढणार नसून याबाबत सरकारच्या शिष्टमंडळासोबत बोलणेही झाले आहे. शिंदे सरकार हे ओबीसी समाजाच्या विरुद्ध काम करत असून या सरकारला गुहाटीला पाठविण्याची तयारी करा असे यावेळी बोलताना प्रा.लक्ष्मण हाके यांनी सांगितले. संवाद यात्रेतील प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांचे स्वागत सुरेश नागरे, नानासाहेब राऊत, लक्ष्मण बुधवंत, अँड. विनोद राठोड, बाळासाहेब घुगे, यांनी केले. यावेळी सकल ओबीसी समाजातील नेते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन टूर्नामेंट कमिटी चेअरमनपदी राजू काणे; सदस्यपदी अभिजीत चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेतर्फे 2024 व 2025 या



हंगामासाठी टूर्नामेंट कमिटीच्या चेअरमन पदी साई काणे क्रिकेट अकॅडमी जालना चे राजू काणे यांची पुन्हा एकदा निवड करण्यात आली आहे तसेच जालना येथील अभिजीत चव्हाण यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.



महाराष्ट्रातील विविध वयोगटातील खेळाडूंना त्यांची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी भरपूर सामन्यांचे नियोजन यशस्वीपणे करणारे राजू काणे यांची टूर्नामेंट कमिटीच्या चेअरमन पदी पुन्हा एकदा निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील अनेक दर्जेदार खेळाडूंना त्यांचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या राजू काणे हे 20 व 23 वर्षाखालील खेळाडूंचे नुकसान होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणात स्पर्धांचे यशस्वी आयोजन करत आलेले आहेत .
राजू काणे व अभिजीत चव्हाण यांच्या निवडीबद्दल जालना जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष ॲड नरेंद्र देशपांडे, उपाध्यक्ष दिलीप शहा, रमेश मगरे, ॲड. श्रीकांत देशपांडे, ॲड. सौरभ नाईक, संदीप पाटील, संतोष भारोटे यांच्यासह खासदार कल्याण काळे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आ. राजेश टोपे, आ. बबनराव लोणीकर, आ. कैलास गोरंट्याल, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, युवासेनाचे अभिमन्यु खोतकर, राजेश राऊत, युवा नेतृत्व अक्षय गोरंट्याल, माजी आ. संतोष दानवे, भास्कर आंबेकर, भास्कर दानवे, संजय खोतकर, राहुल लोणीकर, ॲड. हरिभाऊ झोल, महावीर ढक्का, गणेश राउत, विष्णू पाचफुलें, अशोक पांगारकर, राजेंद्र गोरे बिलाल परसुवाले, साई काणे क्रिकेट अकॅडमीचे सर्व खेळाडू, जालना शहरातील सर्व स्तरावरील संघटना यांनी अभिनंदन केले आहे.



## सुजल सरनायकची मर्चंट नेव्हीमध्ये नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**गोपाल सातपुते**

**हिंगोली :** शहरालगत असलेल्या नगरात येथील संत नामदेव नगरातील पत्रकार गोपालराव सरनायक सवनेकर यांच्या लहान मुलगा चि.सुजल सरनायक याची मर्चंट नेव्ही मध्ये नियुक्ती झाल्याबद्दल बळसोंड येथील पप्पुभाऊ चव्हाण मित्र मंडळ चे वतीने सत्कार करण्यात आला. बळसोंड येथील संत नामदेव नगरातील सुजल गोपालराव सरनायक याने समुंद्रा इन्स्टिट्यूट ऑफ म्यारिटाईम स्टडीज, लोणावळा मधे DNS (डिप्लोमा इन् नौटिकल सायन्स) करून मर्चंट नेव्ही मध्ये डेकॅकडेट हि पदवी मिळाली आहे याबद्दल हिंगोली जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा बळसोंड ग्रामपंचायत उपसरपंच प्रतिनिधी पप्पुभाऊ चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य सुमित धिके यांच्या हस्ते हार, पेढा घालून वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी विशाल जिरवणकर, राजेश मोकाटे,ग्रामपंचायत चे माजी सदस्य रामभाऊ ठमके,पत्रकार गोपालराव सरनायक, विष्णु ठाकरे, किरण घंटे, ऋषिकेश पोले, राजेश नायक, रमण उपाध्याय, गोपाल पवार आदींची उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद हायस्कूल राज्यस्तरावर आदर्श शाळा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद हायस्कूल हे राज्यस्तरावर एक आदर्श शाळा घोषित असल्याने या शाळेतील शिक्षण घेणाऱ्या पाचवी ते दहावीच्या शालेय विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातून येण्या जाण्यासाठी बसच्या प्रवासासाठी परिवहन भत्ता म्हणून प्रत्येकी दरमहा 60 रुपये याप्रमाणे दहा महिन्यांचे सहा हजार रुपयांप्रमाणे शैक्षणिक वर्ष 2023 2024 मध्ये येथील 270 विद्यार्थ्यांना ते पात्र झाल्याने शासनातर्फे भत्ता मंजूर झाला असून तो त्यांच्या वैयक्तिक खात्यावर जमा होणार आहे. परिवहन भत्ता विद्यार्थ्यांना मंजूर झाल्याने विद्यार्थी पालक व शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. जिल्हा परिषद हायस्कूल या तालुक्यातील एकमेव आदर्श शाळा घोषित झाल्याने बसच्या प्रवासासाठी परिवहन भत्ता मिळण्याने ग्रामीण भागातील पालक व विद्यार्थी या प्रशालेत प्रवेश घेण्यासाठी सहकार्य करून आग्रही असतात. या गावात जिल्हा परिषद प्रशाला वगळता इंग्रजी माध्यमाच्या सहा शाळा दहावीपर्यंत सहा कनिष्ठ महाविद्यालय व एक वरिष्ठ महाविद्यालय अशा शैक्षणिक संस्था असून येथील जिल्हा परिषद प्रशालेत यावर्षी 840 विद्यार्थी पाचवी ते दहावी या वर्गात प्रवेश घेऊन शिक्षण घेत आहे शैक्षणिक वर्ष सुरू होऊन पंधरा दिवस झाले व अजून नक्कीच वाढ होईल. मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे यांनी याआधी दरवर्षी अनेक विद्यार्थ्यांना परिवहन भत्ता मिळत होता त्यात यावर्षी अधिक वाढ झाली आहे यावर्षी ग्रामीण विद्यार्थी अधिक असल्याने त्यांना परिवहन भत्ता देखील अधिक संख्येने मंजूर होईल अशी आशा व्यक्त केली.

## राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस तालुका उपाध्यक्षपदी सोहेल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील टाकळी



राजेराय येथील सोहेल अतिक पटेल यांची राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस खुलताबाद तालुका उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती राष्ट्रवादी विद्यार्थी कांग्रेस महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिल दादा गव्हाणे तथा जिल्हा छत्रपती संभाजीनगर राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भुषणजी तांबे यांच्या मान्यतेने तालुका उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.नियुक्ती बद्दल पटेल यांचे राष्ट्रवादी काँग्रेस चे पदाधिकारी कार्यकर्ते चाहते नातेवाईक कडून अभिनंदन स्वागत करण्यात येत आहे.

## दोन जहाल महिला नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जहाल नक्षल नेता नांगसू मनकू तुमरेटी उर्फ गिरीधर याने पत्नी संगीतासह आत्मसमर्पण केल्यानंतर आठ दिवसांत आणखी दोन जहाल महिला नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. बाली ऊर्फ रामबत्ती ऊर्फ झरीना नरोटे (२८,रा. झारेवाडा ता. एटापल्ली) व शशीकला उर्फ चंद्रकला उर्फ सुनंदा उर्फ मनीषा उईके (२९,रा. कटेझरी ता. धानोरा) अशी त्यांची नावे असून दोघांवर १६ लाखांचे बक्षीस होते. नक्षलवाद्यांच्या कंपनी क्रमांक १० च्या प्लाटून पार्टी कमिटी सदस्य व एरिया कमिटी सदस्य म्हणून त्या दोघी काम करायच्या. बाली ही २०१० मध्ये नक्षल चळवळीत सदस्य म्हणून गट्टा दलममध्ये भरती झाली होती. वर्षभरातच तिची अहेरी दलममध्ये बदली झाली. २०१६ मध्ये अहेरी दलममधून कंपनी क्र. १० मध्ये बदली होऊन कार्यरत झाली. २०२१ मध्ये तिला प्लाटून पार्टी कमिटी सदस्य व एरिया कमिटी सदस्य म्हणून बढती मिळाली. तिच्यावर एकूण २१ गुन्हे दाखल असून त्यामध्ये १० चकमक, जाळपोळ, अपहरण प्रत्येकी एक व इतर ९ गुन्ह्यांचा समावेश आहे. शशीकला ऊईके हिने २०११ मध्ये टिपागड दलममधून नक्षल चळवळीत प्रवेश केला. कंपनी क्र. ४ व नंतर १० मध्ये तिची बदली झाली. २०२३ मध्ये तिला बढती मिळाली.

## शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटने वतीने विविध मागण्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन संघटनेच्या वतीने काल दि. २७ ला शिरूर तहसील कार्यालयासमोर एक दिवशीय धरणे आंदोलन व निदर्शने करण्यात आली. राज्यातील रेशन दुकानदार संघटनेने आपल्या हक्कासाठी अनेक महत्वपूर्ण मागण्या यापूर्वी शासनाकडे अनेकदा केल्या आहेत. त्यातील बहुतांश मागण्या अद्यापही पूर्ण झाल्या नाहीत. त्या पूर्ण करण्यात याव्यात या साठी शासनाला स्मरण करून देण्यासाठी हे आंदोलन महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे आदेशाने महाराष्ट्र राज्य विधान मंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्र राज्यातील सर्व तहसील कार्यालयासमोर करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून शिरूर तहसील कार्यालय समोर आंदोलन व निदर्शन करण्यात आले.शिरूरचे नायब तहसीलदार प्रकाश मुसळे यांना संघटनेच्या ववतीने निवेदन देण्यात आले.



इंद्रभान ओव्हाळ - सचिव, महाराष्ट्र राज्य रेशन संघटना राज्यातील रेशन दुकानदाराने आपल्या न्याय हक्कासाठी अनेक मागण्या यापूर्वी शासनाकडे केल्या आहेत .पण प्रत्येक वेळेस महाराष्ट्र शासनाने या मागण्याला केराची टोपली दाखवली आहे. आज २७ जून रोजी धरणे आंदोलन व निदर्शने झाली. येत्या २ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर सर्व तालुक्याच्या वतीने निदर्शने व मोर्चा तर ८ जुलै रोजी आझाद मैदान मुंबई या ठिकाणी राज्यातील ५२ हजार स्वस्त धान्य दुकानदारांचा भव्य मोर्चा काढण्यात येईल. सोमनाथ वचकल - पुणे जिल्हाध्यक्ष रेशन दुकानदार संघटना राज्य सरकारकडून सकारात्मक भूमिका न घेतल्यास राज्यातील सर्व ५२ हजार स्वस्त धान्य दुकान १ एक ऑगस्टपासून धान्याचे वितरण करणार नाहीत. गणेश रत्नपारखी - अध्यक्ष शिरूर तालुका रेशन संघटना " काल शिरूर येथे संघटनेच्या वतीने करण्यात आलेले धरणे आंदोलन,निदर्शन यशस्वी पार पडले असून स्वस्त धान्य दुकानदारांच्या रास्त मागण्या शासनापर्यंत पोहोचाव्यात म्हणून नायब तहसीलदार मुसळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळीसंतोष सरोदे सचिव शिरूर तालुका रेशन संघटना संघटनेतील भरत कालेवार,संजय मोरे,भाऊसाहेब करपे, पंडितराव जगताप, कुशाभाऊ मुंजाळ, गुलाबराव सातपुते, फकीरा गव्हाणे, नवनाथ खैरे, जालिंदर पराड, संजय रत्नपारखी,वारघडे,आनंदा मिडगुले,रमेश राळे,दीपक दुडे,गोविंदराव नरवडे,बाबा गंगावणे,सांबारे मामा,राऊत काका, व शिरूर तालुक्यातील सर्व रेशन दुकानदार उपस्थित होते.

# जिल्हा सामान्य रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या समस्या सोडविणार : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

## भविष्यात नर्सिंग, डेंटल आणि पॅरामेडिकल कॉलेज आणण्याचे नियोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण घेणारे डॉक्टर अभ्यासक्रमासोबतच जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्णसेवाही देत असतात. अशावेळी या डॉक्टरांना चांगली वागणूक मिळावी आणि त्यांच्या हातून चांगली सेवा घडावी, याची पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे येथील निवासी डॉक्टरांच्या मुलभूत समस्या त्वरित सोडविण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. तसेच जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा सर्वोत्कृष्ट करण्यासाठी भविष्यात चंद्रपुरात नर्सिंग, डेंटल आणि पॅरामेडीकल कॉलेज आणणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा सामान्य रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या समस्यांबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी पालकमंत्री बोलत होते. बैठकीला जिल्हाधिकारी विनय



गौडा जी.सी., शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, विशेष कार्य अधिकारी डॉ. विजय इंगोले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. प्रणय गांधी, निवासी डॉक्टर संघटनेचे (मार्ड) डॉ. अक्षय वाघमारे, डॉ. पल्लवी रेड्डी, डॉ. प्रशांत मकदूम आदी उपस्थित होते.

जिल्हा सामान्य रुग्णालयात लवकरच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी आपण व्यक्तिशः लक्ष देऊ, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, 175 सुरक्षा रक्षकांचे 1 कोटी 44 लक्ष 51 हजार 439 रुपये 30 मे 2024 रोजी महाराष्ट्र सुरक्षा मंडळाला देण्यात आले आहे. उर्वरीत रक्कम सुरक्षा मंडळाला त्वरीत देण्यात येईल. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नवीन इमारतीकरीता 450 सुरक्षा रक्षकांचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सुरक्षा रक्षकांचा निधी राज्य शासनाने थेट महाराष्ट्र सुरक्षा मंडळाकडे देण्याबाबतचा विषय मंत्रीमंडळाच्या बैठकीत आपण मांडणार असल्याचे पालकमंत्री यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले, जिल्हा सामान्य रुग्णालयात एका रुग्णासोबत एक नातेवाईक असा नियम आहे. याबाबत रुग्णालयाकडून पास सुध्दा वितरीत करण्यात येते मात्र ब-याचवेळी नातेवाईक रुग्णालयात गर्दी करतात. नातेवाईकांमध्ये एखादा व्यक्ती जर दारु पिऊन असेल तर त्याची माहिती त्वरीत पोलिसांना द्यावी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नवीन इमारतीमध्ये स्थलांतर करण्यासाठी 33 कोटी 65 लक्ष रुपयांचा फर्निचरचा प्रस्ताव आणि 42 कोटी 79 लक्ष रुपयांचा अत्याधुनिक साधनसामुग्रीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. नवीन इमारतीमध्ये चांगल्या कंपनीचे फर्निचर लावा.

**निधीची वाट बघणार नाही :** विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळणे आवश्यक आहे. सामान्य रुग्णालयातील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, त्यांची स्वच्छता व शुध्दीकरण व इतर मुलभूत सुविधांसाठी शासनाच्या निधीची वाट न पाहता जिल्हा नियोजन समिती आणि खनिज विकास निधीतून पैसे उपलब्ध करून दिले जातील, असा विश्वास देत येथील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, असेही श्री. मुनगंटीवार म्हणाले. महिला रुग्णालय त्वरीत सुरू करण्याचे तसेच नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मार्गावरील अतिक्रमण काढण्याचे निर्देशही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.



# स्व. सुभाषराव मोरे पुण्यस्मरणानिमित्त वृक्षारोपण स्तुत्य उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** स्व. सुभाषराव मोरे आणि वृक्षमित्र स्व आबासाहेब मोरे यांनी सामाजिक उत्तरदायित्वातून पर्यावरण मंडळाची स्थापना केली. राज्यभर संस्थेच्या वाढत्या विस्तारातून प्रमोद मोरे वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण समतोलाचे उत्तम कार्य करीत आहेत. स्व. सुभाषराव मोरे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त केलेले वृक्षारोपण आणि वृक्ष वाटप हा एक पर्यावरणीय स्तुत्य उपक्रम आहे, असे प्रतिपादन काष्टी येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भगवानराव पाचपुते (आबा) यांनी केले. श्रीगोंदा तालुक्यातील श्री क्षेत्र सुरेगाव येथे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांचे वडील स्व. सुभाष मोरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता. यावेळी पर्यावरण मंडळाच्यावतीने गुडमार वनौषधी वृक्षांचे वृक्षारोपण व वाटप भगवानराव पाचपुते, ह.भ.प. बाळकृष्ण दळवी महाराज, अध्यक्ष प्रमोद मोरे, वनश्री प्रवीण गुणवरे, कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, प्रा. संजय लाकूडझोडे, सुभाष वाखारे, सुभाष धुमाळ, माजी संचालक अंकुश रोडे, सरपंच प्रसाद रामफळे, अध्यक्ष तुकाराम अडसूळ आदींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भगवानराव पाचपुते (आबा)यांनी मंडळाच्या या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, प्रमोद मोरे हे आपल्या चुलत्यांचा आणि वडिलांचा पर्यावरण संवर्धनाचा वारसा जपत असून महाराष्ट्रातील हजारो कार्यकर्ते त्यांच्या समवेत वसुंधरेला हिरवा शालू परिधान करण्याचे काम करीत आहे. त्यांच्या या पर्यावरण चळवळीला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे महत्त्वपूर्ण योगदान राहील. याप्रसंगी वडिलांच्या पुण्यस्मरणानिमित्त प्रमोद मोरे यांनी संगमनेर तालुक्यातील बाळेश्वर येथील बालसंस्कार व जनजागृती मानव कल्याण सेवाभावी संस्थेतील विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले. यावेळी मारुती कदम, अमोल चंदनशिवे, डॉ. शरद दुधाट, कोंडीराम नेहे, विजय बोडखे, चंद्रकांत भोजने, उत्तम पवार, सरपंच बाळासाहेब ढोले, बाळासाहेब गाडेकर, राजाराम ढवळे, मोहन खवळे, आशाताई कांबळे, मुख्याध्यापक रवींद्र पवार, मुख्याध्यापक शिवाजी उदार, महेश पाडेकर, मच्छिंद्र लहाकर, गुलाब रामफळे, डॉ. अनिल मोरे, गणेश रोडे, यांच्यासह मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नीलाबाई मारोतराव इंगळे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**गोपाल सातपुते**

**हिंगोली :** स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या



विद्यमानाने राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार 2024 या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक 1 जुलै 2024 रोजी अहमदनगर येथील माऊली संकुल सभागृह अहमदनगर येथे सकाळी 11 वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सपन्न होणार आहे. यामध्ये पंजाबराव डक हवामान अभ्यासक परभणी, बाबासाहेब पावसे सरपंच संघ चळवळीचे नेते, डॉ. एस एस मगर. मा. कुलगुरू डॉ. बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली, एकनाथ ढाकणे. राज्यध्यक्ष महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन इत्यादी उपस्थित राहणार आहेत. या पुरस्कार सोहळ्यात राज्यातील सरपंच यांनी केलेले विविध विकास कामांची दखल घेऊन माळधामणी गावच्या प्रथम नागरिक सरपंच नीलाबाई मारोतराव इंगळे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार 2024 या अतिशय मानाच्या पुरस्काराने सन्मानीत करण्यात येत आहे. आजपर्यंत सरपंच इंगळे यांनी गावामध्ये विविध विकास कामे केले असून त्यामध्ये प्रामुख्याने स्वछता, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, वृक्ष संवर्धन याचा समावेश आहे. गावामध्ये केलेल्या विकास कामाच्या जोरावर ग्रामपंचायत माळधामणी यांना जिल्हास्तरीय उत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून पुरस्कार मिळाला तसेच हिंगोली तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला. या गावच्या विकास कामामध्ये ग्रामपंचायत माळधामणी येथील सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, कर्मचारी याचबरोबर गावातील नागरिकांची साथ मिळाली.

# महात्मा गांधी संकुलाचा सीईटीचा उज्ज्वल निकाल: प्राचार्य काकडे

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** महात्मा गांधी संकुलातील विद्यार्थी स्वावलंबी शिक्षणाची धडे घेत आहेत. विद्यार्थ्यांचे कष्ट आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमातून कनिष्ठ महाविद्यालयाने सीईटीच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम जोपासली आहे, असे कौतुकास्पद उद्गार प्राचार्य अंगद काकडे यांनी काढले. प्रवरानगर येथील महात्मा गांधी शैक्षणिक संकुलात सीईटी निकालानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अंगद काकडे हे होते. याप्रसंगी प्राचार्य काकडे उपप्राचार्य अलका आहेर आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. शरद दुधाट यांनी केले. या महाविद्यालयातील एकूण सीईटी व नीट परीक्षेसाठी ३५ विद्यार्थी प्रविष्ट झाली होती. त्यापैकी १५ विद्यार्थी हे सीईटी परीक्षेत ९० टकक्यांच्या पुढे आहेत,तर नीट परीक्षेत दोन विद्यार्थिनीनी ६३७ पेक्षा अधिक गुण मिळविली आहेत. नीट परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थिनी ऐश्वर्या मंडलिक व प्रतीक्षा कापसे तसेच सीईटी परीक्षेत दोन्ही ग्रुपमध्ये यश मिळविणारी विद्यार्थी सोहेल शेख, अनन्या भोर, वैभव जवरे, जय ताजने, आदित्य मोकाशी, सृष्टी थेटे, ओम वरखडे, आदित्य विखे यांच्या बरोबरच त्यांच्या पालकांचा तसेच इ. ११ वी वर्गात प्रविष्ट होणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांचा सन्मान प्राचार्य अंगद काकडे उपप्राचार्य व शिक्षकांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ऐश्वर्या मंडलिक, यश ताजने, मीना भोर व अलका आहेर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य काकडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सीईटी व नीट परीक्षेतील उज्ज्वल यशाबद्दल विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे कौतुक करुन शुभेच्या दिल्या. याप्रसंगी सुभाष भोर, बाबासाहेब थेटे, नितीन राऊत, राहुल पेंढारे,




चारुदत्त पवळ, विशाल मदने, योगेश कोरडे, विलास विखे, कविता विखे, बालिका मंडलिक, राजाराम जवरे, बाळासाहेब वरखेडे, ज्योती भोसले, आनंद भोसले ही पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा ठोकळ यांनी केले तर ज्ञानदेव दवंगे यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यांसाठी पुढे सरसावले पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना प्रत्यक्ष भेटून केली मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** खरीप हंगामाच्या पेरणीला सुरुवात झाली असून शेतकरी वेगाने कामाला लागला आहे, बळीराजाला शासकीय योजनांचा योग्य व तात्काळ लाभ मिळावा, यासाठी मी प्रयत्नशील असून चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली व त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य, वन व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. चंद्रपूर जिल्ह्यातील पंतप्रधान किसान सन्मान योजना तसेच नमो किसान योजनेच्या लाभार्थ्यांच्या नोंदणीची प्रक्रिया वेगाने व्हावी, यासाठी मनुष्यबळ वाढावे तसेच पीक विमा योजनेची उर्वरित 51.31 कोटी रुपयांची अप्राप्त रक्कम तातडीने मिळावी या मागण्यांसाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली व निवेदन दिले. या चर्चेदरम्यान मुनगंटीवार कृषिमंत्र्यांना म्हणाले की, खरीप हंगाम 2023 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील 3 लाख 50 हजार 969 शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पिक विमा काढला होता. खरीप हंगाम सन 2023 - 24 मध्ये सोयाबीन वरील "येलो मोझॅक व बुरशीजन्य रोगामुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले होते. तसेच अवकाळी पावसामुळे कापसाचे नुकसान होऊन उत्पादन घटले होते. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पावले उचलणे भाग आहे. यासंदर्भात दिलेल्या निवेदनात मुनगंटीवार यांनी म्हटले आहे की, पिक विमा योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना 91.62 कोटी रुपये प्राप्त होणे अपेक्षित होते. त्यापैकी केवळ 40.31 कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले असून उर्वरित 51.31 कोटी रुपये पीक विम्याची रक्कम पिक विमा कंपन्यांकडून प्राप्त झालेली नाही. सद्यस्थितीत खरीप हंगाम 2024 मध्ये शेतकऱ्यांची पेरणी सुरू झाली असून मागील पीक विमा रकमेची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. सदर उर्वरित पीक विम्याचे रक्कम तातडीने जमा होण्यासंदर्भात पीक विमा कंपन्यांना निर्देशित करून



शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. यासोबतच दिलेल्या दुस-या निवेदनात मुनगंटीवार यांनी पीक विमा योजनेच्या थकीत रकमेची शेतकऱ्यांसाठी मागणी केली. या निवेदनात त्यांनी म्हटले कि, पंतप्रधान किसान सन्मान योजनेअंतर्गत केंद्र शासनामार्फत पात्र शेतकऱ्यांना सहा हजार रुपये अनुदान म्हणून जमा केला जातो. तसेच महाराष्ट्र शासनामार्फत नमो किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना सहा हजार रुपये अनुदान देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सदर निधी शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्याची कारवाई कृषी विभागामार्फत सुरू असून, यामध्ये शेतकऱ्यांचे ई-केवायसी करणे, आधार प्रमाणीकरण करणे, जमीन नोंदणी करणे इत्यादी कामे अंतर्भूत आहेत; परंतु कृषी विभागामध्ये कमी मनुष्यबळ असल्यामुळे ही कामे तातडीने पूर्ण होण्यास त्रास होत आहे. पर्यायाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून कृषी विभागाने यासंदर्भात योग्य कार्यवाही करणे अपेक्षित आहे. सदर कामे करण्यास संगणक ऑपरेटरची मदत घेणे अपेक्षित असून त्या मार्फत ही कामे करण्यात यावी, अशी मागणी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना केली. या चर्चेला कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि योग्य पावले उचलण्याची ग्वाही दिली.



# रेल्वेच्या धडकेत बिबट्या ठार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मध्य चांदा वन विभागाच्या राजुरा वनपरिक्षेत्रातील चनाखा नियत क्षेत्राचे कक्ष क्रमांक १६० मधून जाणाऱ्या दक्षिण मध्य रेल्वेलाइनवर रेल्वेच्या धडकेत बिबट ठार झाल्याची घटना गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. मृत बिबट अंदाजे ३ वर्षाचा असल्याची माहिती आहे. राजुरा वनपरिक्षेत्रातंर्गत येणाऱ्या विहिरगाव उपक्षेत्राचे कक्ष क्रमांक १६० मधून मध्य व दक्षिण रेल्वे लाइन जाते. गुरुवारी दुपारच्या सुमारास या लाइनवरून रस्ता ओलांडतांना रेल्वेची धडक बसल्याने बिबट्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्राधिकारी यांनी वरिष्ठांना कळविले.राजुरा वनपरिक्षेत्रातंर्गत येणाऱ्या विहिरगाव उपक्षेत्राचे कक्ष क्रमांक १६० मधून मध्य व दक्षिण रेल्वे लाइन जाते. गुरुवारी दुपारच्या सुमारास या लाइनवरून रस्ता ओलांडतांना रेल्वेची धडक बसल्याने बिबट्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्राधिकारी यांनी वरिष्ठांना कळविले. वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी जावून मोका पंचनामा केला. पुढील कारवाई उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, उपविभागीय वनाधिकारी पवन कुमार जोग यांचे मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश येलकेवाड करीत आहे. आतापर्यंत परिसरात रेल्वेच्या धडकेत तीन वाघ व अन्य वन प्राणी ठार झाले आहेत.

# मोलविगंज येथे वकिलांवर हल्ला; आरोपीला अजून अटक नाही

## जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेऊन केली कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** वकील संतोष जाधव व त्यांच्या सहकारी मित्रांना मोलविगंज येथे झालेल्या मारहाणी बाबत आझाद नगर पोलीस स्टेशन, धुळे येथील दि. ०२जुन रोजीचे दाखल गुन्हा चा सखोल, पारदर्शक व निष्पक्ष तपास व्हावा तसेच सदर गुन्हयातील आरोपीतांना तात्काळ अटक कारा अशी मागणी धुळे जिल्हा वकील संघातर्फे जिल्हाधिकारी यांना करण्यात आले.

धुळे बार संघातील सदस्य ॲड. संतोष पी. जाधव यांनी दि. ०२ जुन रोजी आझाद नगर पो. स्टेशन धुळे येथे संहिता कलम १४३, ३२३, ३९२, ५०४ तसेच अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) फिर्याद दिलेली आहे. सदरचा तपास हा उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश रेड्डी यांच्याकडे सुरु आहे. संबंधीत आरोपीतांवर गुन्हा दाखल होवून २७ दिवस झालेले आहेत. बाबत धुळे बार असोसिएशन मा. अध्यक्ष सो. राहूल पाटील यांचे हजेरीत व वकीलांचे हजेरीत आमची मिटींग पार पडलेली आहे. आम्ही आजपावेतो अनेक दिवस होऊन देखील वाट पाहत गेलो की आरोपींना अटक होईल, परंतू आजपावेतो आरोपीतांना अटक झालेली नाही. सदर आरोपी हे निरढावलेले आहेत. त्यांना पोलीस अटक करीत नाही, याचाच अर्थ पोलीस आरोपींना सहकार्य करीत आहे असे या निवेदनात आरोप करण्यात आला.

सदरचा गुन्हा दाखल होवून आजपावेतो तपास अधिकारी यांनी सदर गुन्हयातील आरोपी मामा हॉटेलचे मालक हाजी सिराज मामा, वसीम अन्सारी, फैजल अन्सारी, शाकीर अन्सारी, त्याचे सोबतचे इतर २ इसम



अश्यांना आजपर्यंत अटक केलेली नाही. सदर गुन्हयाची कोणतीही चौकशी केल्याचे दिसून येत नाही, तपास केलेला नाही. तसेच सदरचे तपास अधिकारी हे पक्षपातीपना करत असून आरोपींना सुरक्षा मिळेल असा तपास करीत आहेत असे निदर्शनास येत आहे व फिर्यादीस टाळाटाळ करतात असे या निवेदनात म्हटले आहे. सदर गुन्हयातील आरोपी मामा हॉटेलचे मालक त्यांचा मुलगा व इतर आरोपी हे त्याचठिकाणी राहतात. त्यांचा व्यवसाय ते राजरोषपणे करीत आहेत. रात्री उशिरापर्यंत ते त्यांचे हॉटेल चालवत आहेत. तरी देखील सदर गुन्हयाचे तपास अधिकारी हे त्यांना जाणीवपूर्वक अटक करीत नाहीत, आरोपी हे मोकाटपणे फिरत आहेत, सदर तपास अधिकारी हे त्यांना पाठीशी घालत आहेत. सदर गुन्हयातील तपास अधिकारी यांनी फिर्यादीला ओळख परेडसाठी बोलावले नाही. फिर्यादीचा पुरवणी जबाब व त्यांच्या साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवून घेतलेला नाही. फिर्यादीचे जखमी प्रमाणपत्र देखील हस्तगत केलेले नाही असा आरोप देखील करण्यात आला.सदर गुन्हयातील तपास अधिकारी हे राजकीय दबावावरुन तसेच आरोपी त्यांच्या समाजाच्या लोकांमार्फत दबाव, दडपणावरुन सदर आरोपीतांना मदत करत आहेत. उलटदर्शी गुन्हयातील आरोपींना मदत व्हावी म्हणून त्यांच्या बाजुने साक्षीदार उभे करत आहेत. सदर गुन्हयाचा योग्य, पारदर्शक व निष्पक्ष तपास करत नाही. त्यामुळे सदर गुन्हयातील आरोपीतांना कायद्याचा कोणताही वचक राहिलेला नाही फिर्यादी व्यवसायाने वकील असून देखील त्याला न्यायापासून वंचित रहावे लागत आहे. फिर्यादीवर प्रचंड अन्याय होत आहे, फिर्यादीची कोणतीही चुक नसतांना फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ व गंभीर जीवघेणी अमानुषपणे मारहाण झालेली आहे. असे प्रकार दाबल्यामुळे आरोपींना कायद्याचा धाक राहणार नाही व भविष्यात देखील सदर ठिकाणी मोठी घटना घडण्याची दाट शक्यता आहे म्हणून सदर गुन्हयाचा तपास हा संबंधीत तपास अधिकारी यांच्याकडून काढून योग्य, सक्षम, निष्पक्ष व कार्यक्षम पोलीस अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात यावा तसेच सदर गुन्हयातील आरोपीतांना तात्काळ अटक करण्याचे आदेश व्हावेत व फिर्यादीला न्याय मिळावा अशी विनंती जिल्हाधिकारी यांना करण्यात आली.

# मुस्लिम समाजाला 5 टक्के आरक्षण देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** मुस्लिम समाजाला नोकरी, शिक्षण व राजकीय 5 टक्के आरक्षण देव्यात यावे अशी मागणी आज घनसावंगी येथे आयोजित बैठकीत समाजाच्या वतीने करण्यात आली, त्यानंतर मा.मुख्यमंत्र्यांना तहसीलदार मार्फत विविध मागणीचे निवेदन देण्यात आले महाराष्ट्रातील मुस्लिम परिस्थिती, न्यायमूर्ती सच्चर कमिटी, रंगनाथ मिश्रा आयोग यांनी सांगितली आहे मुस्लिम समाज हा आर्थिक शैक्षणिक राजकीय मागास आहे हे कमिटीने सांगितले आहे म्हणून महाराष्ट्र मधील मुस्लिमांना सुरू अधिवेशनामध्ये 5, टक्के आरक्षणाची घोषणा करावी अशी मागणी निवेदाद्वारे केली आहे. जर दहा दिवसात शासनाने निर्णय नाही घेतला तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ही दिला आहे. यावेळी, नगरसेवक, मुजहेद अली खान, सिने अभिनेते नसीर शेख, नगरसेवक फय्याज पठाण, संचालक जहिरभाई सय्यद, इरफान अली खान, निसार पटेल, झहीर सिद्दिकी, नाजेम पठाण, सरपंच खालील शेख, आतिक पटेल, मुजीब पठाण, निजाम शेख, नेहाल शेख, अफजल शेख, उस्मान शेख, चेअरमन अन्वर पठाण, मुदसिर बेग, फारुक शेख, सय्यद मजहर,शेख मुजीब, जफर शेख, मो.हरीस आदी समाज बाधव उपस्थित होते.



# रुग्णवाहिकेची तीन वाहनांना धडक

## रूग्णवाहिकेत दारूच्या बाटल्या सापडल्याने खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पाथर्डी फाटा परिसरात एका मद्यधुंद कारचालकाने महिलेच्या कारला धडक दिल्याची घटना ताजी असतानाच जिल्ह्यातून दुसरी घटना धक्कादायक घटना समोर आली आहे. ओझरजवळ खासगी रुग्णवाहिकाने वाहनांना धडक दिल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, नाशिक-धुळे महामार्गावर ओझरजवळ खासगी रुग्णवाहिकाने वाहनांना धडक दिली. शिवसेना शिंदे गटाचे आमदार सुहास कांदे यांचे नाव आणि फोटो असणाऱ्या रुग्णवाहिका चालकाने सरकारी रुग्णवाहिकासह दोन वाहनांना धडक दिली आहे.

वाहनचालक मद्यधुंद असल्याने अपघात झाल्याचा नागरिकांचा आरोप आहे. सुहास कांदे यांचे नाव आणि फोटो असलेल्या रुग्णवाहिकेत दारूच्या बाटल्या सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र वाहनांचे नुकसान झाले असून दोन जण जखमी झाले आहेत. अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाथर्डी फाटा परिसरात तरुणाच्या कारने महिलेच्या कारला धडक दिली. यानंतर महिलेच्या मदतीला धावलेल्या लोकांना तरुणाने दमबाजी केल्याचा प्रकार घडला. बहिण पोलीस दलात असल्याचे सांगत तरुणाने नागरिकांना दमबाजी केली. संशयित तरुण मद्यधुंद अवस्थेत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. तरुणाच्या दमबाजीचा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे.

# बहुजन विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षण शिष्यवृत्तीच्या नवीन जाचक अटी रद्द करा : आ. किशोर जोरगेवार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत केली मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय (बहुजन) विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणासाठी शासनाकडून पुरवण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती मध्ये घालण्यात आलेल्या नवीन जाचक अटींमध्ये दहावी, बारावी आणि पदवी परीक्षेत 75 टक्के गुण मिळवणे अनिवार्य करण्यात आले आहे तसेच शिक्षण शुल्क 30 ते 40 लाख रुपयांपर्यंत मर्यादित करण्यात आले आहे. यामुळे अनेक बहुजन विद्यार्थ्यांचे परदेशात शिक्षण घेण्याचे स्वप्न भंग होणार आहे. ही बाब लक्षात घेता, बहुजन विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षण शिष्यवृत्तीच्या नवीन जाचक अटी रद्द करण्यात याव्यात अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घेत केली आहे.



यापूर्वी, परदेशी शिष्यवृत्ती अंतर्गत शिक्षण शुल्क, विमान प्रवास, मासिक निर्वाह भत्ता यासह सर्व खर्च शासनाकडून पूर्णपणे उचलला जात होता. मात्र, आता 'समान धोरण' च्या नावाखाली, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी वार्षिक 40 लाख रुपये आणि पीएच.डी. साठी 12 लाख रुपये (निर्वाह भत्तासह) मर्यादा घालण्यात आली आहे. ऑक्सफर्ड, हार्वर्ड, एमआयटी सारख्या प्रसिद्ध विद्यापीठांमध्ये शिक्षण शुल्क 65 ते 90 लाख रुपये इतके आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारी रक्कम अपुरी असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाल्यानंतरही शिक्षण पूर्ण करणे अशक्य होत आहे.

तसेच, 8 लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेले विद्यार्थीच पात्र असतील आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती घेतलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी शिष्यवृत्ती मिळणार नाही, असे नवे बदल करण्यात आले आहेत. यामुळे अनेक मेधावी आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधीपासून वंचित राहावे लागणार आहे. यापूर्वी, अनुसूचित जाती आणि जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी 55 टक्के आणि ओबीसी विद्यार्थ्यांसाठी 60 टक्के गुणांची अट होती. यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी जगप्रसिद्ध विद्यापीठांमध्ये प्रवेश घेऊन यशस्वीरित्या शिक्षण पूर्ण केले आहे. मात्र, आता 75 टक्के गुणांची अट घातल्याने अनेक विद्यार्थी तणावाखाली आहेत.

ही बाब लक्षात घेता, परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसाठी 75 टक्के गुणांची अट, शिक्षणासाठी रक्कम मर्यादा, कुटुंबातील एकाच विद्यार्थ्याला लाभ, आणि 8 लाख रुपयांच्या उत्पन्न मर्यादेच्या अटी रद्द करून पूर्वीप्रमाणे बहुजन विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे.



# महानुभाव आश्रमात आरोग्य तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** श्रीब्रह्मविद्या पाठशाळा,महानुभाव आश्रम तरडगाव ता.फलटण व वेलनेस फोरेवर मेडीकेयर प्रा.लि.लोणंद शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महानुभाव आश्रमातील साधकांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन रविवार दि.२३ जून २०२४ रोजी करण्यात आले होते. रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, बॉडी मास इंडेक्स, नियमित शारीरिक तपासण्या केल्या. तसेच योग्य आहार, विहार,व्यायाम दैनंदिन जीवनशैली या विषयावर मनोज चव्हाण, लोणंद (फार्मासिस्ट व डायटीशियन) व नम्रता चव्हाण( पी.एच.डी.) यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.तसेच नवले जनरल अँड सर्जिकल हॉस्पिटल,लोणंद ता.खंडाळा येथील डॉ.रोहित नवले (एम.एस जनरल) यांचे विशेष सहकार्य लाभले.ज्या देशातील समाज हा निरोगी असतो.तो देश हा प्रगतीचा शेवटच्या बिंदूवर जाऊन पोहचतो. म्हणून या सर्व बाबींसाठी आरोग्य महत्वाचे असते. म्हणून दैनंदिन जीवनामध्ये आरोग्याला विशेष महत्त्व आहे. आपण त्याची काळजी घेतली पाहिजे. आरोग्य बिघडल्यावर सुधारत बसण्यापेक्षा,आरोग्य बिघडू नये.म्हणून काळजी घेणे हे आपल्या प्रत्येकाच्या हातात आहे. व्यक्तीच्या आहार विहारामध्ये स्वच्छता असावी.कारण स्वच्छतेमुळे आरोग्याला पोषक स्थिती निर्माण होते.वैयक्तिक व सामाजिक पातळीवर प्रत्येकाने स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे. तसेच दैनंदिन जीवनात व्यायामामुळे व्यक्तीचा आरोग्य विषयक दर्जा उंचावतो. नियमित व सुयोग्य व्यायाम असल्यास निरोगी दीर्घकालीन, सुदृढ आरोग्य लाभते.

रोगप्रतिकारक शक्ती वाढते.व्यायामाबरोबरच विश्रांती तेवढीच महत्त्वाची आहे.असे महत्वपूर्ण मार्गदर्शन मनोज चव्हाण यांनी उपस्थित साधकांना केले. या शिबिरासाठी श्रीब्रह्मविद्या पाठशाळा तरडगाव संस्थेचे संचालक आचार्य महंत श्रीराहेरकरबाबा महानुभाव यांची प्रमुख उपस्थिती लाभली.संपूर्ण शिबीराचे नियोजन श्रीब्रह्मविद्या पाठशाळा संस्थेचे प्रतिनिधी पू.श्री.योगीराज राहेरकर महानुभाव(बी.एन.वाय.एस) यांच्या मार्गदर्शनातून संपन्न झाले. महानुभाव आश्रमातील १५० साधकांनी आरोग्य शिबीरात सहभाग घेऊन आरोग्य विषयक माहीती जाणून घेतली. वेलनेस फोरेवर मेडीकेयर प्रा.लि.लोणंद शाखेचे सहकारी कैलास शेळके, रोहन धायगुडे,सचिन झोंड, तेजस शिंदे, सुप्रिया टेलर यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण सहकार्य केले.

# पीएमश्री सावित्रीबाई फुले मनपा शाळेस चंद्रपूर जिल्ह्यातून तृतीय क्रमांकाचे बक्षीस

## मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान स्पर्धेत पी एम श्री सावित्रीबाई फुले मनपा शाळेस चंद्रपूर जिल्ह्यातुन तृतीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले असुन गटशिक्षणाधिकारी निवास कांबळे यांच्या हस्ते मनपा शिक्षणाधिकारी नागेश नित यांना एक लाख रूपयाचा धनादेश प्रदान करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान १ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत राज्यात राबविण्यात आले. या अभियानात राज्यातील हजारोच्या संख्येने शाळा सहभागी झाल्या होत्या. यामध्ये शासकीय आणि खासगी शाळांचाही समावेश होता. शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा शासनाचा उद्देश होता. या अभियानामध्ये शाळा स्तरावरुन माहिती अंतिम करणे, केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर, महापालिका स्तर, विभाग स्तर, राज्य स्तर यानुसार शाळांचे मूल्यांकन करण्यात आले होते. विद्यार्थीदशेत शिक्षणासोबत स्वच्छतेची गोडी लागल्यास स्वच्छता ही विद्यार्थ्याच्या आयुष्याचा भाग बनून जाते. शाळा स्वच्छतेच्या कार्यात त्यांना सकारात्मकपणे सहभागी करुन शिक्षण आनंददायी, प्रेरणादायी वातावरण निर्मिती होण्यासह वैयक्तिक स्वच्छतेची सवय जडते. अभियानाचा हाच उद्देश लक्षात घेऊन आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात अतिरीक्त आयुक्त चंदन पाटील,उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त रवींद्र भेलावे यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात सावित्रीबाई फुले शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेऊन शाळेला स्वच्छ व सुंदर ठेवण्यात यश मिळविले आहे.



# चंद्रपुरात लवकरच 'ई-बस' धावणार!

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वायू व हवा प्रदूषणाच्या तीव्र समस्येचा सामना करणाऱ्या चंद्रपूर शहरात महापालिका लवकरच 'पीएम ई-बस सेवा' सुरू करणार आहे. केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाकडे महापालिकेने ५० 'ई-बस'चा प्रस्ताव पाठवला आहे. शहर आणि परिसरातील २५ किलोमीटरपर्यंत ही बस लोकांना सेवा देईल.

वीज केंद्र, कोळसा खाणी, पोलाद उद्योगांमुळे गेल्या कित्येक वर्षांपासून शहरवासीयांना वायू व हवा प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. त्यात वाहन प्रदूषणाची भर पडली आहे. या पार्श्वभूमीवर शहरात प्रदूषणविरहित 'ई-बस' चालवण्याचा प्रस्ताव महापालिकेने केंद्र सरकारकडे पाठवला आहे. महापालिका आयुक्त विपीन पालिवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य सरकारने ऑगस्ट २०२३ मध्ये 'पीएम ई-बस सेवा' या नावाने केंद्र-प्रायोजित योजनेला मंजुरी दिली होती. ही योजना दोन श्रेणींमध्ये लागू केली जाईल. पहिल्या श्रेणीमध्ये शहर बस सेवा आणि संबंधित पायाभूत सुविधा आणि दुसऱ्या श्रेणीत 'ग्रीन अर्बन मोबिलिटी इनिशिएटिव्ह'चा समावेश आहे.

# जिओ टावरची रेंज नसल्याने कंपनीने टावर काढून नेण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा गावाला जिओ टावर झाले डोकेदुखी टॉवर उभे नावाला रेंज नाही गावाला अशातला प्रकार झाला असून येथील जिओचे सिम धारक खूप वैतागले आहेत सावळद बारा परिसराला लागून असलेले बारा गावाचे सावळद बारा मुख्यालय असल्यामुळे नेहमीच येते लोकांची वर्दळ असते बँका शाळा दवाखाना पोलीस स्टेशन पोस्ट ऑफिस महा-ई-सेवा केंद्र या कामासाठी नागरिकांची येथे प्रमुख उपस्थिती असते पण येथे जिओचे मोठे नेटवर्क असल्यामुळे जवळपास सर्व स्तरावर जिओ नेटवर्क चा वापर केला जातो.

पण गेले कित्येक दिवसापासून जिओ नेटवर्क लोकांची डोकेदुखी बनलेले नेटवर्क बनले आहे.विनाकारण गावात शोभेची वस्तू बनली अधिकारी कर्मचारी कोणी इकडे लक्ष द्यायला तयार नाही. अचानकच टावर जाणे फोन सुरू असताना अचानक कट होणे फोर जी सुविधा असल्यावर टुजी रेंज मिळणे वापर कमी आणि बिल जास्त भरनेशेजारी शेजारी फोन असून फोन न लागणे, अनेक कारणामुळे ग्राहकांना नाहकचा त्रास सहन करावा लागत आहे यामध्ये बीएसएनएल कंपनी सुद्धा अपवाद ठरणार नाही पण भरपूर जणांनी बीएसएनएलला कंटाळून जिओ मध्ये आपले कार्ड पोर्ट केले असून मात्र आता जिओ सुद्धा बीएसएनएलच्या पावलावर पाऊल टाकत असल्याचे चित्र दिसत आहे. अलीकडे मोबाईल कंपन्यांच्या सदोष सेवेमुळे सर्वच कंपन्यांचे ग्राहक त्रस्त झाले आहे

प्रत्येक मोबाईलच्या कंपनीच्या ग्राहकाला विचारले तर काही ना काही तक्रार असल्याचे आढळून आले आहे. परिसरातील लोकांशी संपर्क साधला असता मोबाईल कंपन्याकडून दिल्या जाणाऱ्या सेवांचा नागरिकांनी पाढाच वाचला. जिओ या कंपनीच्या सिम कार्ड वापर करणाऱ्या लोकांना जास्त त्रास होत आहे असे निर्दनाश आले. याचा सर्वाधिक फटका व्यावसायिकांना झाला आहे. मोबाईलला रेंज नसणे डेटा स्पीड कमी असणे अशा वारंवार अडचणी येत असतात त्यामुळे याची तक्रार करायची कुठे? असा प्रश्न सर्वसामान्यांकडून विचारला जात आहे.त्यापेक्षा जिओचे टावर नसलेले बरे असे बरेच ग्राहक म्हणत असल्याचे दिसून येत आहे. इंटरनेटला स्पीड कमी असणे मध्यंतरीच बंद पडणे असे प्रकार वारंवार घडत आहेत.

**रेंज नसल्याने महा-ई-सेवा केंद्र पडतात बंद :** मोबाईलवर पैसे लवकर ट्रान्सफर न होणे, इंटरनेटची स्पीड कमी असणे दुसऱ्या व्यक्तीला नंबर अस्तित्वात नसल्याचे सांगणे असा त्रास सातत्याने होत असतो विद्यार्थी यांचे सध्या कागद पत्रे काढणे आवश्यक आहे .तसेच पिक कर्जसाठी सातबारा, उतारा असे कोणतेही प्रकारचे महत्त्वाचे काम करावयाचे असले की रेंज राहत नाही .

**विजय बाविस्कर सेवा केंद्र सावळदबारा ता सोयगाव**

**बऱ्याच शेतकऱ्यांचे रेंज नसल्याने पोष्टात अडकले पैसे :** पोस्टात खाते असणारे ग्राहक माझ्याकडे येत असतात व त्यांना पैसे काढणे टाकण्याची आवश्यकता असते पण जिओ टावर नेटवर्क अडचणीमुळे बऱ्याचशा लोकांना मनस्ताप सहन करावा लागतो आणि पेरणीची दिवस आहे शेतकऱ्यांना पैशाची गरज असते आणि त्यांना निराश होऊन माघारी जावे लागते . याचाच फटका बँकेतील ग्राहकांना बसत आहे अशा बऱ्याच समस्यांना सामोरे दवाखाना शाळा कॉलेज पोस्ट ऑफिस बँका याचा ताप सहन करावा लागतो त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना माहिती असूनही जाणूनबुजून झोपेचे सोंग घेत आहे . अधिकारी यांनी जिओ टावर ची तात्काळ दखल घेऊन सेवा सुरळीत करावी .



**विजय आप्पा कुल्ले पोलिस पाटील, सावळदबारा ता . सोयगाव**

# विद्यार्थ्यांचे प्रस्ताव त्रुटीमध्ये न टाकता ईडब्लूएस प्रमाणपत्र द्या

## राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेची तहसीलदार यांच्याकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** तालुक्यातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणीक कामाकरिता ईडब्लुएस प्रमाणपत्र लवकर मिळण्यासाठी सर्व कागदपत्रासह तहसिल कार्यालयात प्रस्ताव दाखल करुनही विद्यार्थ्यांना ईडब्लूएस प्रमाणपत्र वेळेत मिळत नाही तहसिलकडून प्रमाणपत्र देण्यास विलंब होत आहे. प्रस्तावात त्रुटी काढून बाजुला ठेवल्या जात आहे. त्यामुळे प्रस्ताव त्रुटीमध्ये न ठेवता त्या अर्जदाराकडून त्रुटीची पूर्तता करुन घेवुन तात्काळ ईडब्लुएस प्रमाणपत्र द्यावे अशी मागणी तहसिलदार मुखेड यांच्याकडे राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेच्या वतीने दि.२७ जुन रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले की अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील काही विद्यार्थ्यांच्या वडील व आजोबांच्या शैक्षणीक व इतर दाखल्यावर मुस्लिम/मुसलमान असा जातीचा उल्लेख आहे तर मुलांच्या दाखल्यावर छबरबंद,मंसुरी,लदाफ अशाप्रकारे जातीचा उल्लेख झालेला आहे.त्यामुळे वडिलांची आणी मुलाची जात जुळत नसल्यामुळे ईडब्लुएस प्रमाणपत्राची फाईल त्रुटीमध्ये टाकल्या जात आहे. पण अशाप्रकारच्या समस्या असणाऱ्या विद्यार्थ्यांना मागील वर्षामध्ये १०० रूपयाचे बाँन्डवर शपथपत्र घेवुन ईडब्लुएस प्रमाणपत्र देण्यात आले परंतु यावर्षी वडील व मुलांच्या दाखल्यावरील जात जुळत नसल्याचे कारण सांगून विद्यार्थ्यांची फाईल त्रुटीमध्ये टाकल्या जात आहे.यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान होत आहे.विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तहसिल कार्यालयाकडून त्यांच्या प्रस्तावमधील त्रुटीची पूर्तता करवून घेवुन गोरगरीब, सर्वसामान्य मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यास अडवणूक न करता शैक्षणीक दाखल्यावर असलेली



वडील आणी मुलांची जात एकच असल्याचे शपथपत्र तसेच यापूर्वी त्यांच्याकडे ओबीसी जातीचे प्रमाणपत्र नसल्याबाबतचे शपथपत्र १०० रूपयाच्या बाँन्डवर घेवुन विद्यार्थ्यांना ईडब्लुएस प्रमाणपत्र तत्काळ देण्यात यावे.त्रुटीची पुर्तता करुन १०० रुपयांच्या बाँन्डवर शपथपत्र दिल्यानंतरही विद्यार्थ्यांना वेळेत प्रमाणपत्र नाही मिळाल्यास राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेच्या वतीने तहसील कार्यालयासमोर तिव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेचे जिल्हाध्यक्ष महेताब शेख, तालुकाध्यक्ष असद बल्खी, महाराष्ट्र ग्राहक पंचायत संघटनेचे तालुकाध्यक्ष खाजा धुंदी,पत्रकार मोहमद रफीक शेख, ॲड. युसुफ तांबोळी, ॲड. सय्यद शफी, बबलु भाई धुंदी, अल्पसंख्याक परीषदेचे शहर समन्वयक गौस मिर्झा, फिरदोस शेख, सय्यद जफर कादरी आदी उपस्तीथ होते.




# आशाताई शिंदेंकडून आत्महत्याग्रस्त कल्लारे कुटुंबीयांचे सांत्वन

## आत्महत्याग्रस्त मयत कल्लारे कुटुंबीयांना आशाताईंची मदत



आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील मौजे दगडसांगवी येथील अल्पभूधारक शेतकरी मयत बालाजी पंढरी कल्लारे वय वर्ष 45 यांनी सततची नापीकी व आर्थिक विवंचनेतून गळफास घेऊन आत्महत्या केली होती. आत्महत्याग्रस्त मयत बालाजी कल्लारे यांच्या घरी काल दि. 27 जून गुरुवार रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी भेट देऊन कल्लारे कुटुंबीयास वयक्तिक मदत देऊन आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांचे सांत्वन केले. या आत्महत्याग्रस्त कल्लारे कुटुंबीयांना भरीव शासकीय आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीद्वारे आशाताई शिंदे यांनी संपर्क साधून संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना आत्महत्याग्रस्त कलारे कुटुंबीयांना भरीव शासकीय मदत लवकरच मिळवून देण्याचे आश्वासन यावेळी कल्लारे कुटुंबीयांशी बोलताना सांगितले यावेळी बोरगावचे सरपंच प्रतिनिधी पुंडलिक पाटील बोरगावकर, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रं.विश्वंभर पाटील क्षिरसागर, पारडी माजी सरपंच दिगंबर पाटील डिकळे, समन्वय समिती लोहाचे सदस्य सिद्धू पाटील वडजे, खरेदी विक्री संघाचे संचालक सुधाकर सातपुते, सुरेश पा.फाजगे, भानुदास फाजगे, नितीन फाजगे, संभाजी कलाळे, बळीराम कलाळे, उत्तम फाजगे, हौसाजी बेराडे, कामाजी मोरतळे, तिरुपती बेराडे, संदीप मोरतळे, पांडुरंग फाजगे सह कार्यकर्ते, पदाधिकारी, गावकरी यावेळी उपस्थित होते.

# प्रो.डॉ. सुनील कुलकर्णी साहित्य वाचस्पति उपाधीने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर च्या हिंदी विभागाचे माजी विद्यार्थी तथा निदेशक, केंद्रीय हिंदी संस्थान आगरा व केंद्रीय हिंदी निदेशालय,नवी दिल्ली (अतिरिक्त प्रभार) येथे कार्यरत प्रोफेसर डॉ.सुनील कुलकर्णी देशगव्हाणकर यांना हिंदी साहित्य संमेलन प्रयाग कडून केंद्रीय विद्यापीठ ,कोरापुट ( ओडिसा) येथील 75 व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्धाटन सत्रात 'साहित्य वाचस्पति' उपाधी ने सन्मानित करण्यात आले ही उपाधी त्यांना संमेलनाचे मुख्य अतिथी प्रोफेसर आर.एस.सर्राजू, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा केंद्रीय विद्यापीठ




ओडिसाचे कुलपती प्रोफेसर चक्रधर त्रिपाठी, साहित्य संमेलनाचे प्रधानमंत्री कुंतक मिश्र, साहित्य मंत्री प्रोफेसर राजकिशोर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली प्रो डॉ सुनील कुलकर्णी हे संमेलनाच्या अध्यक्षस्थानी विराजमान होते या संमेलनाचे अध्यक्षस्थान यापूर्वी महात्मा गांधी, पंडित मदनमोहन मालवीय, स्वतंत्र भारताचे प्रथम राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद, राजर्षी पुरुषोत्तम दास टंडन, सुप्रसिद्ध साहित्यिक बद्रीनाथ चौधरी प्रेमघन, सुप्रसिद्ध समिक्षक तथा इतिहासकार बाबू श्यामसुंदर दास, सुप्रसिद्ध हिंदी कवि अयोध्या सिंह उपाध्याय, माखनलाल चतुर्वेदी, पंडित राहुल सांस्कृत्यान या महान साहित्यकांची परंपरा या संमेलनाला लाभली आहे देशगव्हाण सारख्या ग्रामीण भागाची पार्श्वभूमी असणाऱ्या प्रोफेसर डॉ सुनील कुलकर्णी यांच्या या सन्मानाने त्यांचें आईवडील, नातेवाईक,मित्र आणि सहकार्यांनी अभिनंदन केले आहे.

# सर्जा-राजा वाहणार नाथांच्या पालखीचा भार; पैठण शहरात मिरवणूक

## पैठण तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने जोरदार स्वागत..

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नाथांच्या पालखी रथाला शेवगाव तालुक्यातील हादगाव येथील मंत्री कुटूंबाच्या सर्जा, राजा बैल जोडीला मान देण्यात आला आहे. मानकरी मंत्री यांनी वारी निमित्ताने आज पैठण शहरात सर्जा- राजाचे आगमण केले. मंत्री परिवारात तीन पिढ्या पासून तिसर्या पिढीतही परपंरा डॉ. निलेश श्रीनिवास मंत्री यानी आजही राखली आहे. या रथाचे सारथी म्हणू जिवन गादे हे दर वर्षी करतात. दरवर्षी पैठण येथील नाथ महाराजाच्या रथाचा भार मानाच्या बैलजोड्या वाहत असतात. याही वर्षी हा मान मंत्री कुटुंबातील सर्जा राजा या बैल जोडीला मिळाला



आहे. नाथाचा रथ ही जोडी ओढणार असून गुरुवारी या जोडीचे पैठण शहरात जल्लोषात स्वागत करत मिळवणूक काढण्यात आली. यावेळी बाल वारकरी यांनी टाळ मृदंगाच्या जयघोषाणे संपूर्ण परिसर दुमदुमला होता. मिरवणुकी दरम्यान पैठणच्या वेशिवर कृषी जगत व तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी अध्यक्ष ज्ञानेश्वर उगले, सचिव रामेश्वर सुसे, योगेश महाराज पालखीवाले, सचिन उंडाळे, सोमनाथ हजारे, बाळासाहेब रंधे, संपतराव खराद, सावता गादे, सुरेश वैद्य, शहादेव जाधव, लखन शेरे यांची उपस्थिती होती. विविध ठिकाणी बैलजोडीची पूजन करण्यात आले. याप्रसंगी पालखी सोहळा प्रमुख आदिंसह पैठणकर ग्रामस्थ उपस्थित होते.



# महापुरुषांच्या सन्मानासाठी पुण्यात रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्राचे अराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह अन्य महापुरुष व राष्ट्रीय प्रतीके यांच्या सन्मानासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रात आज शुक्रवारी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. पुण्यात नवले ब्रिज, गाडीतळ हडपसर, किवळे याठिकाणी कार्यकर्त्यांनी रास्ता रोखुन धरल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. महापुरुषांचा वारंवार होणारा अपमान, काही दिवसांपूर्वी हडपसरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकावर झालेली दगडफेक या घटना सामाजिक बंधुतेला काळिमा फासणाऱ्या व सकल हिंदूंचा अपमान करणाऱ्या आहेत. याचा निषेध करण्यासाठी आणि सामाजिक शांतता व सुरक्षा धोक्यात आणणारा गुन्हेगारांना दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा देणारा' कायदा पारित करावा, या मागणीसाठी हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आल्याची भावना सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी केली. नवले ब्रिज येथील रास्ता रोको आंदोलनात शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले.




## वाकद ग्रामस्थांचा हक्कासाठी रास्ता रोको

### आंदोलनात महिलांचा मोठा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** वाकद ग्रामपंचायत गावातील ग्रामस्थांना गावात मूलभूत सुविधा पुरवित नसून गावामधे अनेक समस्या आ वासून उभ्या आहेत. जसे घरकुल, नरेगा अंतर्गत लाभ मिळत असलेल्या सिंचन विहीर यासह विविध शासकीय लाभांच्या योजनांची प्रकरणेही अडकवून ठेवल्याचा आरोप करीत याकडे वरिष्ठांचे लक्ष वेधण्यासाठी 26 जून रोजी वाकद बसथांब्यावर सकाळी 10 ते 12 या वेळेत रास्ता रोको आंदोलन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आले. पावसाळ्याचे दिवस असतानाही वाकद ग्रामपंचायतीने गावात स्वच्छतेची कामे केली नाहीत, जलजीवन मिशनच्या काम अपूर्ण असल्याने गावकऱ्यांना भर पावसाळ्यातही डोईवरचा पाण्याचा हंडा कायम आहे.दूरवरून पाणी आणावे लागत आहे. याशिवाय घरकुल, सिंचन विहिरींच्या फाईल देखील अडवून ठेवल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला. या गंभीर बाबीकडे पंचायत समिती तसेच जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी गावकरी, वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व ग्रामपंचायत उपसरपंचासह आठ सदस्यांनी बुधवारी सकाळी वाकद ते मेहकर रस्त्यावर सकाळी 10 ते 12 वाजेपर्यंत रास्ता रोको आंदोलन केले. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धारही गावकऱ्यांनी केला. दरम्यान, पंचायत समितीच्या चमूने आंदोलनस्थळी भेट देऊन ग्रामपंचायत स्तरावर पारित झालेले ठराव पंचायत समितीकडे पाठवा, त्यावर वरिष्ठांच्या मार्गदर्शनात योग्य तो तोडगा काढण्यात येईल.वाकद गावातील जलजीवन मिशन योजनेचे काम त्वरित सुरू करून गावकऱ्यांना पाणी पुरविण्याच्या मागणीसाठी महिलांनी सुद्धा हंडे घेऊन रास्ता रोको आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला होता.पंचायत समिती चमूने सर्वच समस्यांवर योग्य उपाय योजना करण्याचे आश्वासन गावकऱ्यांना दिल्याने रास्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात आले. रास्ता रोको आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते, ग्रामपंचायत उपसरपंचासह 8 सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनाच्या वेळी पोलिस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवला होता.

## पावसाचे पाणी कंपनीत घुसल्याने नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** शहरातील मार्केट यार्ड रोडवरील रस्ता व नाल्या नसल्यामुळे पाटोद्यात झालेल्या जोरदार पावसामुळे संत मिराबाई ट्रेडिंग कंपनी मध्ये पाऊसाचे पाणी घुसल्याने वीस ते पंचवीस लाख रुपयांचे नुकसान याबाबत सविस्तर वस्ती असे की पाटोदा नगरपंचायत अंतर्गत बाजार समिती मध्ये असलेल्या संत मीराबाई ट्रेडिंग कंपनी यामध्ये सोमवारी दिनांक 13/06/2024 रोजी झालेल्या जोरदार पाऊस झाल्याने कंपनीत पाणी घुसल्यामुळे लाख रुपयांचे नुकसान झाले.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## विदर्भात दीर्घ प्रतीक्षेनंतरर पावसाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दीर्घ प्रतीक्षेनंतर का होईना विदर्भात सर्वदूर खऱ्या अर्थाने मोसमी पावसाचे आगमन झाले. पश्चिम विदर्भात दाखल झालेल्या पावसाने पूर्व विदर्भाला पावसाची प्रतीक्षा करायला लावली. मात्र, ही प्रतीक्षा सध्यातरी संपली असून गुरुवारी रात्रीपासूनच सर्वदूर मध्यम ते मुसळधार पाऊस दाखल झाला. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात भारतीय हवामान खात्याने पश्चिम विदर्भात मोसमी पाऊस दाखल झाल्याची घोषणा केली. त्याठिकाणी पाऊसदेखील होता. इकडे पूर्व विदर्भ मात्र कोरडाच होता. पाऊस सातत्याने हुलकावणी देत असतानाच हवामान खात्याने पूर्व विदर्भात देखील मोसमी पाऊस दाखल झाल्याची घोषणा केली. मात्र, त्याचवेळी पावसाने दडी मारली होती. त्यामुळे वातावरणात देखील प्रचंड उकाडा होता आणि तापमानातसुद्धा वाढ होत होती. त्यातच प्रादेशिक हवामान खात्याने १५ जुलै पर्यंत मुसळधार पावसाची प्रतीक्षा करावी लागणार असा इशारा दिला. तो खोटा ठरवत दीर्घ प्रतिक्षेनंतर का होईना गुरुवारी नागपूरसह पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भात पाऊस दाखल झाला. प्रत्यक्षात मोसमी पावसाचे संकेत गुरुवारी रात्रीपासून सुरू झालेल्या या पावसाने दिले. त्यामुळे सर्वात जास्त आनंद शेतकऱ्यांना झाला. पेरणीसाठी असाच पाऊस जास्त लाभदायक ठरतो आणि त्यामुळेच हा पाऊस कायम राहावं असे शेतकऱ्यांना वाटत आहे. तर त्याचवेळी सर्वसामान्य नागरिक देखील या मध्यम स्वरूपाच्या पावसाने आनंदी झाले आहेत. गुरुवारी रात्रीपासून नागपूर शहरात पावसाला सुरुवात झाली आणि अजूनही मध्यम स्वरूपात कोसळणारा हा पाऊस कायम आहे. तर दुसरीकडे वर्धा जिल्ह्यात सुद्धा पावसाची रिपरिप सुरूच आहे. पाऊस सार्वत्रिक असल्याने ग्रामीण भागात दिलासा मिळाला आहे. गोंदिया जिल्ह्यात मध्यरात्रपासून पावसाला सुरुवात झाली आणि सकाळी पावसाचा जोर आणखी वाढला. कुठे मुसळधार तर कुठे मध्यम स्वरूपात पाऊस सुरू आहे. वाशीम जिल्ह्यात मध्यरात्रीपासून पावसाला सुरुवात झाली आहे. कुठे ढग दाटून आले तर कुठे पावसाच्या हलक्या सरी कोसळत आहेत.

# साधू वासवानी इंटरनॅशनल स्कूलला फिडे बुद्धिबळ शाळा सुवर्ण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आंतरराष्ट्रीय योग दिवस आणि आंतरराष्ट्रीय संगीत दिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या योग प्रात्यक्षिक आणि संगीत कार्यक्रमाचे आयोजन साधू वासवानी इंटरनॅशनल शाळेमध्ये करण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे औचित्य साधून (फिडे) जागतिक बुद्धिबळ संघटने चे पदाधिकारी यांना आमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी नुकतेच मोशी येथील साधू वासवानी इंटरनॅशनल शाळेला जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या एज्युकेशन कमिशन कडून फिडे बुद्धिबळ शाळा सुवर्ण पुरस्कार जाहीर करण्यात आला होता.

ह्या पुरस्काराचे प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी जागतिक बुद्धिबळ संघटनेचे (फिडेचे) एज्युकेशन कमिशनचे सदस्य बोरीस ब्रुन ( जर्मनी),भारताचे ग्रॅंडमास्टर अभिजीत कुंटे,तसेच फिडेच्या सोशल कमिशनचे अध्यक्ष श्री आंद्रे व्हॉग्टलीन ( स्वित्झर्लंड), सचिव लासमा कोकोरेव्हिका (लॅटव्हिया) आणि जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या (फिडे) मिडीया च्या भारताच्या प्रतिनिधी नंधिनी सारीपल्ली हे प्रतिनिधी मंडळ उपस्थित होते. यावेळी ह्या प्रतिनिधी मंडळाच्या हस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका आरती पाटील,शाळेचे बुद्धिबळ प्रशिक्षक केशव अरगडे, बुद्धिबळ खेळाचे प्रातिनिधिक स्वरूपात दोन विद्यार्थी यांना पुरस्कार प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी संपूर्ण कार्यक्रमात आपली उपस्थिती राखून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. मुख्यत्वे विदेशी प्रतिनिधी मंडळ जर्मन भाषिक असल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यांचे स्वागत जर्मन भाषेत करण्यात आले. यानंतर शाळेच्या संगीत शिक्षकांनी सादर केलेल्या शास्त्रीय संगीताने मान्यवर मंत्रमुग्ध झाले. उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थी प्रेक्षक नंतर जर्मन भाषेतील स्वागत गीत ऐकून थक्क झाले. यानंतर शाळेच्या इयत्ता दुसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या योग प्रात्यक्षिकांना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. यावेळी शाळेच्या ५ वी ते ८वी वर्गांच्या समन्वयिका रोशन जॉर्ज यांनी उपस्थितांची ओळख करून देऊन, संपूर्ण जगभरातून २२ शाळांनी ह्या पुरस्कारासाठी अर्ज केला होता,यातील १३ शाळांना सुवर्ण,६ शाळांना रजत आणि ३ शाळांना कांस्य पुरस्कार जाहीर झाले आहेत.भारतातील केवळ दोन शाळांना सुवर्ण पुरस्कार जाहीर झाला.महाराष्ट्रातील सर्वप्रथम हा पुरस्कार मिळवण्याचा मान साधू वासवानी इंटरनॅशनल स्कूल मोशी यांनी मिळवला आहे. दुसरी शाळा चैन्नई येथील वेल्लमल स्कूल या शाळेला मिळाला आहे ज्या शाळेतून भारताचे नऊ दिग्गज ग्रॅंडमास्टर्स तयार झाले आहेत. अशी माहिती त्यांनी दिली. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका आरती पाटील यांनी जागतिक बुद्धीबळ संघटनेच्या(फिडे) प्रतिनिधी मंडळाचे स्वागत केले. यानंतर पुरस्कार प्रदान कार्यक्रम प्रसंगी जागतिक बुद्धिबळ संघटनेचे ( फिडेचे ) सोशल कमिशनचे अध्यक्ष आंद्रे व्हॉग्टलीन यांनी शाळेच्या बुद्धिबळातील विशेष उपक्रमांचे, तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे कौतुक केले. त्यानंतर त्यांनी ग्रॅंडमास्टर अभिजित कुंटे यांच्या आग्रहास्तव स्वतः पर्वतासन विद्यार्थ्यांसमोर करुन दाखवले आणि योगाचे ही महत्व पटवून दिले. यावेळी फिडेचे एज्युकेशन कमिशनचे बोरीस ब्रुन यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका आरती पाटील यांचे व शाळेतील बुध्दिबळ उपक्रमांची दखल घेत कौतुक करुन या पुरस्कारासाठी शाळेत घेण्यात येणारे उपक्रम आणि सुविधा कारणीभूत आहेत हे पटवून दिले. यावेळी फिडे प्रतिनिधी मंडळाने फिडे या जागतिक संघटनेला १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका आरती पाटील आणि शाळेचे बुद्धिबळ प्रशिक्षक केशव अरगडे यांना फिडेचे नुकतेच स्वित्झर्लंड येथे प्रकाशित झालेले पोस्ट टिकिट, पाकिट आणि भेटकार्ड प्रदान केले. यावेळी या सर्व उपस्थितांनी शाळेच्या संगीत व बुध्दिबळ कक्षाला भेट दिली. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका आरती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या संगीत व योग शिक्षकांनी केले. यावेळी शाळेचे सर्व क्रीडा शिक्षक,विषय व वर्ग शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# पावसाळ्यात विषारी सापांपासून शेतकऱ्यांनी राहावे सावधान

## पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशनचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्र राज्यामध्ये पावसाळा सुरु झाला व पेरणीसाठी शेतकरी राजा आपल्या काळ्या आईच्या कुशीमधे बीज पेरणी करत आहे. पावसाचा जोर वाढल्यामूळे सापांच्या बिळात पाणी शिरल्याने ते सुरक्षित स्थळी आश्रय घेतात . मग ते शेत शिवार असो की कुणाचे घर, किंवा जणावरांचा गोठा तसेच रचलेले सरटण, गवऱ्या अश्या ठिकाणी साप आश्रय घेतात साप विषारी असो किंवा बिनविषारी तो दिसताच नागरिक भयभीत होतात व त्याला ठार मारतात. जिल्ह्यात 'विषारी' सापाच्या मुख्य ४ जाती आहे. त्यात मन्यार, नाग, घोनस, फुरसे तर 'निमविषारी' सापामधे मांजऱ्या, हरणटोळ, भारतीय अंडीखाऊ व जाडरेती सर्प या जाती आहे. तसेच 'बिनविषारी' जाती मध्ये भारतीय अजगर, धामण, तस्कर, नानेटी, डुरक्या घोनस, कुकरी, धूळनागीण, कवड्या, दिवड, रुका, गवत्या, मांडुळ या जातींचा समावेश होतो. सापांच्या मिलनाचा काळ मार्च-एप्रिल हे दोन महिने असतो, मे महिन्यात साप अंडी घालतो. सापांची अंडी उबवण्यासाठी ३० डिग्री अंश सेल्सीयस पेक्षा कमी तापमाणाची गरज असते. असे तापमान असलेल्या ठिकाणी साप अंडी देतो. ५० ते ६० दिवसात म्हणजेच जुन जुलै या महिन्यात पिल्ले बाहेर येतात तसेच काही प्रजातीचे साप म्हणजे घोणस, फुरसे, हरणटोळ या सारखे साप पिल्लाना जन्मदेतात पिल्लाची संख्या एक वेळी ३० ते ८० ईतकी असू शकते तसेच पावसाळी महिन्यात सर्वत्र निसर्ग बहरलेला असल्या त्यामुळे या काळात बहुतांशी साप जास्ती च्या प्रमाणात पाहायला मिळतात. निसर्गाचा समतोल व जीवन चक्र राखण्यासाठी साप व प्रत्येक वन्यजीव वाचवीने गरजेचे आहे. साप जवळील आवारात आढळून आल्यास काय करावे तसेच साप दिसल्यास स्वतः पकडण्याचे धाडस करू नये नाहीतर ते जीवावर हि बेतू शकते, आपल्या घरा शेजारी किंवा आवारात साप दिसल्यास त्या सापावर लक्ष ठेऊन सर्पमित्राशी किंवा वनविभाग टोल फ्री क्रं १९२६ वर संपर्क करणे. * घरात साप आढळून आल्यास त्याच्या पासून ४ ते ६ फुट अंतर ठेऊन उभे राहावे. शेतात तसेच रस्त्यावर साप आढळून आल्यास इजा न पोहचविता त्यास जाऊ द्यावे. त्या पासून लांब थांबावे. **सर्पदंश झाल्यास :** सर्पदंश झाल्यास जखम स्वच्छ पाण्याने धुवावी तसेच ज्या व्यक्तीस सर्पदंश झाला आहे त्याला पाणी व जेवण देऊ नये व लवकरात लवकर वेळ न गमवता त्या व्यक्तीस जिल्हा रुग्णालयात न्यावे. ज्या ठिकाणी सर्पदंश झाला आहे त्या अवयवाची जास्त हालचाल करू नये. विष हे तंत्र- मंत्राने उतरत नाही त्यामुळे कोणत्या हि मंदिरात भोंदू बाबाकडे नेऊ नये याने सर्पदंश झालेल्या व्यक्तीच्या जीवाला धोका वाढू शकतो.

**विशाल शिंदे वन्यजीवरक्षक** : खऱ्या अर्थाने पहिला गेले तर साप हा शेतकऱ्याचा खरा मित्र आहे . निसर्गाची अन्नसाखळी कायम राखण्यासाठी सापांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे . सर्पदंश झाल्यास घाबरून न जाता जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयात उपचार घेणे आवश्यक आहे . सुशील विभुते अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सर्पमित्र संघटना महाराष्ट्र मध्ये पावसाळ्यात दरवर्षी सर्पदंशात अनेक लोकांचा मृत्यू होतो . पावसाळा सुरु झाल्या पासून जवळपास उन्हाळयापर्यंत काळजी व खबरदारी घेणे आवश्यक आहे . सर्पदंशाबाबत शेतकरी तसेच ग्रामीण भागात वन विभाग मार्फत वन्यजीव संस्थेनं मार्फत जनजागृतीची कार्यशाळा घेणे गरजेचे आहे . पुणे जिल्ह्यामधे कोणत्या हि ठिकाणी सर्प जनजागृती कार्यशाळा घेण्यासाठी संपर्क ९४२३२१३२८३

# कृषी संजीवनी पंधरवडा निमित्त सावळदबारा येथे शास्त्रज्ञ दीपक कच्छवे यांचे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे आज दिनांक 26/6/2024 रोजी मौजे सावलदबारा येथे ग्रामपंचायत कार्यालयात कृषी संजीवनी पंधरवाडा निमित्त सोयाबीन,तूर व इतर कडधान्य लागवड व तंत्रज्ञान या दिनानिमित्त तूर,मूग, उडीद या पिकाची परिपूर्ण माहिती माननीय डॉक्टर दीपक कच्छवे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले.तुम्हाला कोणत्याही पिकाविषयी अडचण आली तर मला कॉल मी तुम्हाला मागदर्शन करेल असे पण त्यांनी बोलताना सांगितले.यावेळी तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदीया.मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले.कृषी पर्यवेक्षक अतुल पाटील, कृषी सहायक सुरळकर व सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान,प्रा योगेश चोपडे,ग्रामपंचायत मोहन सुरडकर, भागवत जाधव सरपंच टिटवी, शेतकरी प्रदिप तुकाराम काळे,मो.आशपाक मो.ईशा, योगेश गायकवाड, सोनू ठाकूर, उपसंपादक गोकुळसिंग राजपूत, पत्रकार दिलीप देशमुख, पत्रकार रहीम खान पठाण, प्रगतीशील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

# छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने सामाजिक न्यायाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना बुधवार(ता,२६)रोजी येथील पालिका वाचनालयात जेष्ठ वाचक व जेष्ठ नागरिक यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले,जेष्ठ वाचक भीमराव पुंजाजी थोरात व पी,एन, क्षीरसागर यांनी प्रथम छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक, सामाजिक, विद्यार्थी, शाळा, वसतिगृह, व राधानगरी धरण, सुती मिल विषयी व शेतकरी कल्याणकारी या शाहू महाराजांच्या धोरण विषयी माहिती दिली. जेष्ठ नागरिक व वाचक सर्वश्री भीमराव थोरात,परशराम गावडे, पी.एन. क्षीरसागर,आय,जे,शिंपी, सहायक ग्रंथपाल गुलाबराव गायकवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाचे आभार सहायक संजय राजपूत यांनी मानले. येथील पालिका कार्यालयात ही मुख्याधिकारी भागवत बिघोत (राजपूत)यांच्या उपस्थितीत सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन करण्यात आले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार
किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

